- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४२,३५० /-
✔ २२ कॅरेट : १,३१,२७० /-
✔ चांदी : १,९३,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : मंगळवार, २७ ऑक्टोबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१७ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

ऑडिओ क्लिपप्रकरणी एसआयटी स्थापन





वृत्तसंस्था, मुंबई

मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहारासंदर्भात प्रसारित केलेल्या ऑडिओ क्लिप प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे. मुंबई पोलिस आयुक्त देवेन भरती यांनी सोमवारी याबाबतचा आदेश जारी केला.

मुंबईच्या दक्षिण प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे हे या पथकाचे प्रमुख आहेत. ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी, अनुषंगिक तांत्रिक तपास आणि प्रकरणाच्या सर्व बाजूंची निष्पक्ष चौकशी करण्याची जबाबदारी या पथकावर सोपविण्यात आली आहे. पथकाच्या सदस्यांमध्ये पोलिस उपायुक्त विजयकांत सागर आणि पोलिस उपायुक्त बजरंग बनसोडे यांचा समावेश आहे. जरांगे-पाटील यांनी २२ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषद घेऊन कथित ऑडिओ क्लिप जारी केली होती. या क्लिपमध्ये शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत जरांगे-पाटील यांना ५०० कोटी रुपये देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

तसेच या क्लिपमध्ये भाजपशी संबंधित काही व्यक्तींच्या नावांचा उल्लेख असल्याचा दावाही विरोधकांकडून करण्यात आला आहे. या क्लिपवरून सत्ताधारी शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये बेबनाव निर्माण झाला आहे. शिवसेना नेते रामदास कदम यांनी पत्रकारपरिषद घेऊन भाजप नेत्यांचा नावानिशी उल्लेख केला होता. भाजपच्या प्रविण दरेकर, प्रसाद लाड या नेत्यांनी रामदास कदमांना प्रत्युत्तरही दिले. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोप-प्रत्यारोप टाळा असा सल्ला आपल्या पक्षातील नेत्यांना दिला.

भाजपनेही यावर पडदा टाकला. मात्र भाजपने ही क्लिप शिवसेना ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनीच एआयचा वापर करून केली असा आरोप करत याची चौकशी करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या प्रकरणाची चौकशी करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार आता मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन केली आहे.

आमच्याकडे आणखी पुरावे : मनोज जरांगे

५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिप प्रकरणी राज्य सरकारने एसआयटी चौकशी जाहीर केल्यानंतर, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला अत्यंत तीव्र शब्दांत इशारा दिला आहे. आमच्याकडे या प्रकरणाशी संबंधित आणखी बरेच पुरावे आहेत, आम्हाला पुढचे पाऊल उचलायला भाग पाडू नका अशा गर्भीत शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांना सुनावले आहे.

आयपीएस बलकवडे तपास प्रमुख

या प्रकरणाचे राजकीय गांभीर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेता, गृहखात्याने आयपीएस अधिकारी शैलेश बलकवडे यांची तपास प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. बलकवडे हे त्यांच्या कडक आणि निष्पक्ष कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखालील हे विशेष पथक थेट मुंबई पोलिस आयुक्तांच्या देखरेखीखाली काम करेल.

अध्यक्ष : शैलेश बलकवडे (अप्पर पोलिस आयुक्त)
सदस्य : विजयकांत सागर (पोलिस उपायुक्त)
सदस्य : बजरंग बनसोडे (पोलिस उपायुक्त)

एसआयटी तपासाची दिशा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आदेशानुसार, मुंबई पोलिसांचे हे विशेष पथक या प्रकरणाच्या मूळाशी जाणार आहे.

फॉरेन्सिक ऑडिट

ही ऑडिओ क्लिप खरी आहे की आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) किंवा डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आली आहे, याची फॉरेन्सिक लॅबोरेटरीकडून पडताळणी केली जाईल.

संभाषणाचा स्रोत

ही ऑडिओ क्लिप नेमकी कोणी रेकॉर्ड केली आणि ती सर्वात आधी कोणी व का व्हायरल केली, याचा शोध सायबर सेलच्या मदतीने घेतला जाईल.

बदनामीचा कट

या संपूर्ण प्रकरणामागे राज्याची सामाजिक शांतता भंग करण्याचा किंवा राजकीय नेत्यांना लक्ष्य करण्याचा काही संघटित कट आहे का, याचाही सखोल तपास केला जाईल.

काय आहे ऑडिओ क्लिपमध्ये ?

५०० कोटींचा उल्लेख

मराठा आंदोलन शांत करण्यासाठी ५०० कोटी रुपयांच्या कथित देवाणघेवाणीची चर्चा.

नेत्यांची नावे

ऑडिओ क्लिपमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावांचा आक्षेपार्ह उल्लेख.

आरोपांचे प्रत्यारोप

भाजपने यामागे ठाकरे गटाच्या नेत्यांचा हात असल्याचा आरोप केला, तर विरोधकांनी हा भाजपमधीलच अंतर्गत वादाचा प्रकार असल्याचा दावा केला आहे. एसआयटी आणि सायबर पोलिसांच्या संयुक्त तपासानंतरच या कथित क्लिपमागचा खरा चेहरा आणि सत्य जनतेसमोर येईल.

थोडक्यात

९ महिन्यांच्या बाळाला उंचावरून फेकले, आरोपी अटकेत

मुंबई : पती-पत्नीमधील किरकोळ वादातून एका क्रूर बापाने आपल्याच अवघ्या ९ महिन्यांच्या निष्पाप पोटच्या गोळ्याला स्कायवॉकवरून खाली फेकून दिल्याची धक्कादायक आणि संतापजनक घटना घाटकोपर परिसरात घडली आहे. या भीषण घटनेत चिमुकला गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या सायन रुग्णालयात वैद्यकीय उपचाराची शर्थ सुरू आहे. याप्रकरणी पंतनगर/घाटकोपर पोलिसांनी आरोपी बापाला बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काल रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास फिर्यादी आरती जाफर शेख आणि तिचा मुलगा आरव (वय नऊ महिने) हे घाटकोपर रेल्वे स्टेशन बाहेरील स्कायवॉकवर थांबले होते. त्याच वेळी तिचा पती जाफर शेख तिथे आला. त्याने आरतीसोबत कौटुंबिक कारणावरून जोरदार वाद घालण्यास सुरुवात केली. वाद विकोपाला गेला आणि आरोपी जाफर याने आरतीला शिवीगाळ करत तीव्र रागाच्या भरात ९ महिन्यांच्या चिमुकल्या आरवला थेट जीवे मारण्याच्या उद्देशाने स्कायवॉकवरून खाली फेकून दिले. उंचावरून खाली फेकल्या गेल्यामुळे ९ महिन्यांचा आरव गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील स्थानिकांनी आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

लोकशाही वाचवण्यासाठी देशात दुसरा स्वातंत्र्य संग्राम लढावा लागेल

बुलडाणा : देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाचा खरा मालक सर्वसामान्य नागरिक ठरला होता. मात्र, आज देशात जनतेचे राज्य नसून निवडणूक आयोग आणि केंद्र सरकार निवडक उद्योगपतींसाठी व्यवस्था चालवत असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. बुलडाणा येथे काँग्रेसच्या व्होट चोर, गद्दी छोड, या विशेष अभियानांतर्गत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी मध्य प्रदेशचे माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव हे विशेष निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी मतदार याद्यांमधील कथित गैरव्यवहार, एसआयआर प्रक्रियेतील त्रुटी, निवडणूक आयोगाची भूमिका आणि खाजगी कंपन्यांचा हस्तक्षेप यावर सविस्तर आकडेवारीसह गंभीर आरोप केले. मतदार नोंदणी आणि वगळणी प्रक्रियेतील त्रुटींवर बोट ठेवताना सपकाळ म्हणाले, मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, वगळणे किंवा बदल करणे हा अधिकार उपविभागीय अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिका-यांचा असतो. मात्र, आज हे अधिकारी केवळ कागदपत्रे डिजिटल स्वरूपात अपलोड करण्याचे काम करत आहेत. प्रत्यक्ष यादीत बदल करण्याचे कोणतेही अधिकार त्यांच्या हातात राहिलेले नाहीत.

मुख्यमंत्र्यांना सह्याद्रीचे वाळवंट करायचंय का ?

कर्जतमधील वृक्षतोडीवरून सयाजी शिंदेंचा सरकारला सवाल



वृत्तसंस्था, मुंबई

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आणि भीमाशंकर अभयारण्य परिसरात टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पासाठी होत असलेल्या वृक्षतोडीवरून राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. राजकीय नेत्यांनंतर आता पर्यावरणप्रेमी आणि अभिनेत्यांनी या जंगलतोडीविरोधात तीव्र रोष व्यक्त केला आहे.

सह्याद्रीच्या जंगलाचे महत्त्व सांगताना सयाजी शिंदे म्हणाले, भारतातील एकूण जंगल जमिनीपैकी ५ टक्के जंगल आपल्या सह्याद्रीत आहे. याच डोंगरांमुळे आणि झाडांमुळे पाऊस पडतो, इथूनच उगम पावणाऱ्या नद्यांवर संपूर्ण महाराष्ट्र जगत आहे. मात्र, आता याच सह्याद्रीवर नवनवे प्रकल्प आणले जात आहेत. टोरेंटचा प्रकल्प हा त्यातलेच एक असून, त्यासाठी ६०० एकर जमीन देऊन तिथली झाडे राजरोसपणे तोडली जात आहेत.

या प्रकल्पातून मिळणाऱ्या फायद्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करत त्यांनी सरकारला धारेवर धरले. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारू इच्छितो की, ७१ कोटींची गुंतवणूक आणि ३० हजार कोटींचा फायदा तसेच यातून निर्माण होणारी वीज नेमकी कुणासाठी आहे ? तिथल्या झाडांसाठी ? की तिथल्या मोर, प्राणी आणि ५० प्रकारच्या माशांसाठी ? या सर्वांचे नुकसान करून आणि पर्यावरणाचा बळी देऊन असले प्रकल्प कशाला हवेत ? माझी पहिली बांधिलकी निसर्गाशी असून, मी आधी पशू-पक्षी आणि झाडांच्या बाजूने उभा राहीन, त्यानंतर माणसांचा विचार करेन, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

जनतेने पेटून उठावे,

कायद्यात बदल करा

शिंदे यांनी मुख्यमंत्री आणि वनमंत्र्यांना थेट साद घालत कायद्यात बदल करण्याची मागणी केली. तुम्हाला जे प्रकल्प करायचे आहेत ते करा, पण निसर्गाला फसवू नका. नियम बदला, कायद्यात बदल करा, पण झाडे तोडू नका. आपण निसर्गाला नाही, तर स्वतःलाच फसवतोय. तसेच, आपल्या डोळ्यादेखत सह्याद्रीचे वाळवंट होऊ नये यासाठी महाराष्ट्राच्या जनतेने आता पेटून उठले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

आज ठरणार कोण 'पदवीधरांचा' नेता !

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निकालाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष; बंडखोरी, नाराजी आणि मनोमिलनाचा मतपेटीतून फैसला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत रंगलेली चुरशीची लढत, उमेदवारांमधील राजकीय संघर्ष, पक्षांतर्गत नाराजी आणि बंडखोरी यांचा फैसला आज होणार आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान घडलेल्या नाट्यमय घडामोडींचा मतदारांवर नेमका किती परिणाम झाला, याचे उत्तर मतमोजणीतून समोर येणार आहे. त्यामुळे आजच्या निकालाकडे केवळ उमेदवारांचेच नव्हे, तर संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अनिल सोले यांची नाराजी, बंडखोरी अन् मनोमिलन; भाजपला किती फायदा ?

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपमधील नाराजीचा मुद्दा विशेष चर्चेत राहिला. अनिल सोले यांच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. त्यानंतर घडलेल्या मनोमिलनाच्या घडामोडींमुळे या संपूर्ण प्रकरणाला वेगळे वळण मिळाले.

दै. सिंहवाणी वृत्त विशेष
अजय बिवडे,
संपादक

या घडामोडींचा भाजपच्या अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या मतांवर नेमका काय परिणाम झाला, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सोले यांच्या नाराजीमुळे निर्माण झालेली संभाव्य मतविभागणी मनोमिलनानंतर कितपत थांबली ? पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि पदवीधर मतदारांनी पक्षाच्या उमेदवाराला किती साथ दिली ? नाराजी दूर झाल्याचा फायदा भाजपला झाला की अंतर्गत मतभेदांचा फटका बसला ? या प्रश्नांची उत्तरे आजच्या निकालातून स्पष्ट होणार आहेत.

नितेश कराळे यांचा एल्गार; महाविकास आघाडीसमोरील आव्हान







किती प्रभावी ?

दुसरीकडे, महाविकास आघाडीच्या विरोधात नितेश कराळे यांनी दिलेला एल्गारही निवडणुकीत चर्चेचा विषय ठरला. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांच्या भूमिकेमुळे राजकीय वातावरण तापले होते. त्यातच मतदानाच्या अवघ्या एक दिवस आधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून त्यांची हकालपट्टी झाल्याची घटना समोर आली. या घडामोडींनंतर कराळे यांची भावनिक प्रतिक्रिया आणि राजकीय भूमिका चर्चेत राहिली.

या संपूर्ण प्रकरणाचा मतदारांवर किती परिणाम झाला, हे आज स्पष्ट होणार आहे. कराळे यांच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीच्या मतांमध्ये फूट पडली का ? त्यांचा बंडखोरीचा फायदा विरोधकांना झाला की मतदारांनी वेगळी भूमिका घेतली ? या प्रश्नांची उत्तरे मतमोजणीच्या निकालातून शोधली जाणार आहेत.

अभिजीत वंजारी यांच्यासाठी बंडखोरी किती डोकेदुखी ?

काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी यांच्यासाठीही ही निवडणूक महत्त्वाची मानली जात आहे. महाविकास आघाडीतील राजकीय समीकरणे, विरोधातील आव्हाने आणि नितेश कराळे यांच्या बंडखोर भूमिकेचा त्यांच्या मतांवर किती परिणाम झाला, याबाबत उत्सुकता आहे.

कराळे यांच्या भूमिकेमुळे काँग्रेसच्या मतांचे विभाजन झाले असेल, तर त्याचा वंजारी यांच्या मताधिक्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र, पदवीधर मतदारांनी पक्षनिष्ठेला प्राधान्य दिले की उमेदवारांच्या स्वतंत्र भूमिकांना पसंती दिली, हे निकालानंतरच स्पष्ट होईल.

मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने ?

या निवडणुकीत केवळ दोन प्रमुख राजकीय गटांमधील लढत एवढाच मुद्दा महत्त्वाचा नाही, तर पक्षांतर्गत नाराजी, बंडखोरी, मनोमिलन आणि उमेदवारांची वैयक्तिक प्रतिमा यांचाही कस लागणार आहे. प्रचारादरम्यान झालेल्या आरोप-प्रत्यारोपांपेक्षा मतदारांनी प्रत्यक्ष मतदानातून कोणाला पसंती दिली, हेच निर्णायक ठरणार आहे.

भाजपचे सुधाकर कोहळे आपली बाजू भक्कम करण्यात यशस्वी ठरतात की काँग्रेसचे अभिजीत वंजारी बाजी मारतात ? अनिल सोले यांच्या नाराजी प्रकरणाचा भाजपला फटका बसतो की मनोमिलनामुळे पक्षाला दिलासा मिळतो ? नितेश कराळे यांच्या बंडखोर भूमिकेचा किती प्रभाव पडतो ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आजच्या निकालातून मिळणार आहेत.

एकंदरीत, नागपूर पदवीधर मतदारसंघाचा निकाल हा केवळ विजय-पराजयाचा आकडा ठरणार नसून, पक्षांतर्गत नाराजी, बंडखोरी आणि राजकीय मनोमिलन यांच्या परिणामांचाही लेखाजोखा मांडणारा ठरणार आहे. मतदारांनी कोणाला कौल दिला आणि कोणाच्या राजकीय गणितांना धक्का बसला, याचा फैसला आज मतमोजणीतून होणार आहे.

शाह यांच्या मानहानीप्रकरणी राहुल गांधी यांची निर्दोष मुक्तता



वृत्तसंस्था, नवी दिल्ली

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल दाखल झालेल्या २०१८ मधील मानहानीच्या प्रकरणात उत्तर प्रदेशातील सुलतानपूर येथील विशेष न्यायालयाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांची निर्दोष मुक्तता केली आहे. पुराव्यांअभावी राहुल गांधी यांची निर्दोष मुक्तता केल्याचे न्यायालयाने सांगितले. या खटल्याच्या अंतिम निकालाच्या वेळी राहुल गांधी स्वतः सुलतानपूर न्यायालयात हजर होते. न्यायालयाच्या निर्णयानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी न्यायालयाबाहेर जल्लोष करत निकालाचे स्वागत केले. २०१८ मध्ये झालेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान बंगळुरू येथील सभेत राहुल गांधी यांनी अमित शाह यांच्याबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा आरोप मिश्रा यांनी केला होता. त्यानंतर भाजप नेते विजय मिश्रा यांनी ४ ऑगस्ट २०१८ रोजी ही तक्रार दाखल केली होती.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद

अंतिम सुनावणीदरम्यान राहुल गांधी यांच्या वकिलांनी स्पष्ट केले की, हे वक्तव्य कोणत्याही व्यक्तीचा अपमान करण्याच्या हेतूने केले नव्हते, तर ते सद्भावनेने केले गेले होते. सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या विधानाचा विपर्यास करून ते संदर्भाबाहेर मांडल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाने केला.

दुसरीकडे, तक्रारदाराच्या वकिलांनी दावा केला की, राहुल गांधी यांनी वक्तव्य केल्याची कबुली दिल्यामुळे त्यांना दोषी ठरवून शिक्षा देण्यात यावी. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला होता. विशेष दंडाधिकारी शुभम वर्मा यांनी सोमवारी निकाल जाहीर करत, पुरेसे पुरावे नसल्याचे नमूद करून राहुल गांधी यांना निर्दोष घोषित केले.

संपादकीय लेखणीतून...

हिंदी-चिनी भाई-भाई

हिंदी-चिनी भाई-भाईची घोषणा आता इतिहासजमा झाली आहे. दोन्ही देशांमधील भाईचारा संपुष्टात आला असून दोघांतील वितुष्ट वरचेवर वाढत चालले आहे. भारत-चीनमध्ये जुलै २०२६ पासून अरुणाचल प्रदेशात अनेक चकमकी झाल्याचा गौप्यस्फोट इंडो-तिबेट बॉर्डर दलाचे (आयटीबीपी) महासंचालक शत्रूजीत सिंह कपूर यांनी केला आहे. आयटीबीपीच्या महासंचालकांनी सार्वजनिकरित्या पहिल्यांदाच दोन्ही देशांच्या सैन्यातील संघषार्ची कबुली दिल्याने विरोधी पक्षांनी मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. याचा अर्थ ५६ इंच छाती देशाची दिशाभूल करत आहे, यात शंका नाही. काही दिवसांपूर्वी चिनी अध्यक्ष शी जिनपिंग नवी दिल्लीत आले होते. त्यांच्या बरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छायाचित्रे प्रसिद्ध झाली होती. मग हे सारे नाटक होते की काय? अशी शंका येणे साहजिक आहे. दोन्ही देशांमध्ये खरोखरच मैत्री संबंध असतील तर अशा चकमकी घडतातच कशा? राजस्थानच्या अलवर येथील मध्यवर्ती प्रशिक्षण महाविद्यालयात हिमवीर सन्मान कार्यक्रमात शत्रूजीत सिंह कपूर बोलत होते.

ते ३१ ऑक्टोबरला सेवेतून निवृत्त होत आहेत. निवृत्तीला ७ दिवस शिल्लक असतानाच त्यांनी हे विधान केल्याने खळबळ उडाली आहे. ते म्हणाले, जुलै अखेरीपासून अरुणाचल प्रदेशातील सुबनगिरी जिल्ह्यातील असाफिला व माजा भागात तणाव निर्माण झाला आहे. भारताने या सीमेवर आपली लष्करी कुमक वाढवली आहे. गलवान संघर्षाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून खास ड्रोन फोर्स तेथे तैनात करणे गरजेचे आहे. आयटीबीपीने आपल्या सर्व सुरक्षा बटालियनमध्ये ड्रोन तुकडी उभारली आहे. ड्रोन पायलटना प्रशिक्षण दिले जात आहे. आधुनिक युद्धात सैनिक व इमारतींना थेट लक्ष्य केले जाऊ शकते त्यामुळे भुयारी तुकड्या तयार केल्या जात आहेत. गलवानसारखी परिस्थिती उद्भवल्यास आधुनिक युद्ध कौशल्य व नवीन पद्धतीचे शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. प्रत्येक बटालियनमध्ये शौर्य कमांडो पथक तयार केले जाणार आहे.

असफिलासारख्या भागात चिनी सैनिकांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून अवघ्या ६ ते ७ कि. मी. अंतरावर आपल्या छावण्या उभारल्या आहेत तसेच जुलैपासून दोन्ही देशांमध्ये ३ उच्चस्तरीय बैठका झाल्या आहेत तरीही तणाव कायम आहे. आयटीबीपीच्या आधुनिकीकरणासाठी ४ हजार कोटी खर्च केले जातील. त्यात १ हजार कोटी ड्रोन व ॲन्टी ड्रोन यंत्रणेसाठी वापरले जातील. सध्या ४०० कोटींच्या योजनेतील ७० टक्के रक्कम ड्रोन क्षमता वाढवण्यासाठी खर्च केली जात आहे. चीनचे सैन्य निर्धारित गस्त पद्धतीपासून विचलित झाल्यास भारत-चीन प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील (एलएसी) परिस्थिती वेळोवेळी बिघडते, असे भारताने शुक्रवारी स्पष्ट केले. सीमावर्ती भागात शांतता आणि स्थैर्य राखणे हे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याचे भारताने नमूद केले आहे. अरुणाचल प्रदेशात सीमेवरील अनेक भागात चिनी सैन्यासोबत अजूनही संघर्षाच्या घटना घडत आहेत, असे आयटीबीपीचे महासंचालक शत्रूजीत सिंह कपूर यांनी म्हटले आहे. त्या संबंधांत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी तसेच गैरसमज आणि चुकीचे आकलन टाळण्यासाठी दोन्ही देश विद्यमान राजनैतिक आणि लष्करी यंत्रणांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहेत. सीमावर्ती भागात शांतता आणि स्थैर्य राखणे हे द्विपक्षीय संबंधांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे, असे जयस्वाल म्हणाले.

अरुणाचल प्रदेशात भारत-चीन सैन्यादरम्यान झालेल्या कथित चकमकीच्या घटनांवरून काँग्रेसने पंतप्रधान मोदींवर जोरदार टीका केली. सीमावर्ती परिस्थितीबाबत पंतप्रधानांनी सविस्तर निवेदन देऊन देशाला आणि संसदेला विश्वासात घ्यावे, अशी मागणी काँग्रेसने केली. चिनी राष्ट्राध्यक्षांसोबतच्या बैठकांमध्ये सीमावादाचा मुद्दा उपस्थित न केल्याबद्दल विरोधी पक्षाने मोदींवर भित्रेपणाचा आरोप केला. भारताचे हितसंबंध चीनसमोर गहाण पडू देता कामा नयेत, असेही काँग्रेसने स्पष्ट केले. मोदी यांनी २०२० मध्ये पूर्व लडाखमधील हिंसक संघषार्नंतर चीनला दिलेल्या कथित क्लीनचिटमुळे चीनचे मनोबल वाढले आणि त्याने अरुणाचल प्रदेशातही आक्रमक भूमिका घेतली, असा आरोप काँग्रेसने केला. चीनच्या सीमेवरील परिस्थितीवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी दिल्लीत आंदोलने रोखण्यासाठी सुरक्षा दल तैनात केले जात असल्याचा आरोप सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी केला.



महासागरांचे वाढते तापमान आणि सुपर एल निनोचे जागतिक संकट

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

पृथ्वीवरील सजीव सृष्टीचा समतोल, हवामानाचे चक्र आणि मानवी जीवनाचा आधार हा महासागरांच्या तापमानावर अत्यंत नाजूकपणे अवलंबून आहे. सध्या पृथ्वीवरील महासागरांचे सरासरी तापमान सुमारे १७ अंश सेल्सिअस इतके आहे. जागतिक तापमानवाढीमुळे या तापमानात होणारी अवघ्या १ ते २ अंशांची वाढही आज जगभरासाठी महाभयंकर चिंतेचा विषय बनली असून, त्यामुळे निसर्गाचे चक्र पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. विज्ञानाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास, जर एखाद्या दुदैर्वी किंवा अत्यंत विनाशकारी काल्पनिक परिस्थितीत महासागरांचे तापमान अचानक ३० अंश सेल्सिअसने वाढले, तर ते थेट ४७ अंश सेल्सिअसच्या (सुमारे ११७ अंश फॅरेनहाइट) घरात पोहोचेल. ही अवस्था म्हणजे पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या अंताची अधिकृत सुरुवात असेल. पाण्याचे तापमान ४७ अंश सेल्सिअसवर पोहोचणे म्हणजे महासागरांचे रूपांतर एका महाकाय, उकळत्या कुंडात होण्यासारखे आहे.

विज्ञानानुसार, गरम पाण्यात ऑक्सिजन विरघळण्याची क्षमता अत्यंत कमी असते. त्यामुळे या तापमानात पाण्यातील ऑक्सिजनची पातळी झपाट्याने शून्यावर येईल. पृथ्वीला सर्वाधिक ऑक्सिजन पुरवणारे सूक्ष्मजीव नष्ट होतील, ज्यामुळे केवळ समुद्रातीलच नव्हे, तर जमिनीवरील जीवांचाही श्वास कोंडेल. तापमान अवघे १ ते २ अंश वाढले तरी समुद्रातील प्रवाळ भित्तिका मरतात, तिथे ३० अंशांच्या वाढीमुळे जगातील सर्व प्रवाळ रचना काही तासांतच पांढऱ्या पडून मृत होतील. मासे, देवमासे आणि कासवांसारखे सागरी जीव अक्षरशः होरपळून प्राणाला मुकतील आणि सागरी अन्नसाखळी मुळासकट कोलमडून पडेल.

या काल्पनिक मात्र प्रलयंकारी परिस्थितीचे परिणाम केवळ समुद्रापुरते मर्यादित राहणार नाहीत. महासागरांचे तापमान इतक्या प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन आजच्या तुलनेत हजारो पटींनी अधिक वेगाने होईल. वातावरणात अब्जावधी टन पाण्याची वाफ जमा होईल, जी पृथ्वीवरील उष्णता आणखी वाढवेल. या प्रचंड ऊजेर्मुळे समुद्रात आजवर मानवाने कधीही न पाहिलेली महाभयंकर चक्रीवादळे निर्माण होतील. या वादळांचा वेग आणि आकार इतका मोठा असेल की ती संपूर्ण खंडे उद्ध्वस्त करू शकतील. त्याच वेळी, पाण्याच्या औष्णिक प्रसरणामुळे आणि ध्रुवीय भागावरील सर्व बर्फ काही महिन्यांतच वितळल्यामुळे समुद्राच्या पातळीत २०० ते २५० फुटांहून अधिक वाढ होईल. यामुळे मुंबई, न्यूयॉर्क, लंडन आणि टोकियो यांसारखी जगातील सर्व प्रमुख किनारी शहरे कायमची जलमय होतील. पिण्यायोग्य गोड्या पाण्याचे सर्व स्रोत एकतर समुद्राच्या पाण्याने दूषित होतील किंवा बाष्पीभवनामुळे कोरडे पडतील. अन्न आणि पाण्याच्या पूर्ण अभावामुळे मानवी संस्कृतीचा काही दिवसांतच दुर्दैवी अंत होईल. ही परिस्थिती आजच्या घडीला काल्पनिक वाटत असली, तरी निसर्गाचा समतोल किती नाजूक आहे, हे यावरून स्पष्ट होते.

ही टोकाची परिस्थिती बाजूला ठेवली, तरी वर्तमानकाळातील वास्तव याहून वेगळे आणि दिलासादायक नक्कीच नाही. पॅसिफिक महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान आता प्रत्यक्षात ३० अंश सेल्सिअस एवढ्या विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. महासागराच्या पृष्ठभागाच्या तापमानातील ही वाढ संपूर्ण जगावर एका अत्यंत तीव्र आणि सुपर एल निनोचे भीषण सावट निर्माण करत आहे. जागतिक हवामान संघटनेने २१ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या आणि गंभीर अहवालानुसार, या अभूतपूर्व हवामान बदलाचा आणि एल निनोचा प्रभाव २०२७ मध्येही असाच अत्यंत तीव्र स्वरूपात जाणवू शकतो. समुद्राच्या तापमानावरील अभ्यासासाठी वैज्ञानिकांकडून विषुववृत्तीय पॅसिफिक महासागराच्या एका विशिष्ट भागात समुद्राचे तापमान सामान्यपेक्षा किती वाढले, यावरून एल निनोची तीव्रता ठरवली जाते. जर सलग ३ महिन्यांच्या कालावधीत ही वाढ ०.५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाली, तर एल निनो सक्रिय झाल्याचे मानले जाते. यापूर्वी २०१४ ते २०१५ च्या काळात तापमानात २.३ अंशांची वाढ झाली होती, मात्र यंदा ही वाढ २.८ अंशांवर गेली असून ती ३.८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या ४ दशकांतील तापमानाची नोंद ठेवण्यास सुरुवात झाल्यापासूनचे सर्व विक्रम मोडीत काढणाऱ्या या प्रखर तीव्रतेमुळेच याला 'सुपर एल निनो' असे नाव देण्यात आले आहे.

या जागतिक हवामान बदलाचा सर्वांत मोठा आणि थेट फटका भारताच्या मान्सूनवर आणि पर्यायाने शेतीवर व अर्थव्यवस्थेवर पडला आहे. जून महिन्यामध्ये पॅसिफिक महासागरात एल निनो सक्रिय झाल्यानंतर साधारण ४० ते ४५ दिवसांनंतर भारताभोवतीच्या समुद्रांवर त्याचे गंभीर परिणाम दिसू लागले. देशातील एकूण वार्षिक पावसापैकी तब्बल ७० टक्के पावसाची भिस्त ज्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांवर असते, त्यांचा वेग ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस पूर्णपणे मंदावला. परिणामी, ऑगस्टमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ८३ टक्के आणि सप्टेंबरमध्ये ९२ टक्के पाऊस झाला. संपूर्ण पावसाळी हंगामाचा विचार करता नैऋत्य मान्सून सरासरीच्या केवळ ८७ टक्क्यांवरच रोखला गेला. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, २००१ नंतरचा हा चौथा, तर १९०१ नंतरचा तेरावा सर्वांत कमी पावसाचा हंगाम ठरला आहे. पावसाच्या या भीषण तुटीमुळे खरीप पिकांना मोठा फटका बसला असून, पाणीटंचाईचे सावट गडद झाले आहे. एल निनोचा हा प्रभाव केवळ पावसावरच थांबत नाही, तर त्याचा थेट परिणाम आगामी हिवाळ्यावरही पडणार आहे. ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर या काळात तापमान सामान्यपेक्षा जास्त राहून यंदाचा हिवाळा अत्यंत उष्ण राहण्याची शक्यता हवामानतज्ज्ञांनी वर्तवली आहे, ज्यामुळे रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनावरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सुपर एल निनोचे हे प्रलयंकारी परिणाम केवळ भारतापुरते मर्यादित नसून, संपूर्ण जगाचे हवामान आणि जागतिक अर्थव्यवस्था यामुळे एका मोठ्या संकटात सापडली आहे. उत्तर गोलार्धातील दक्षिण युरोप, आफ्रिकेचा काही भाग, अरेबियन द्विपकल्प आणि पूर्व आशियामध्ये उष्णतेची भयंकर लाट येण्याची शक्यता आहे. याउलट, मध्य-पूर्व आशिया, आग्नेय आशियाचा किनारपट्टीचा भाग आणि उत्तर अमेरिकेत ढगफुटी व अतिवृष्टी होऊ शकते. दुसरीकडे, दक्षिण गोलार्धातील संपूर्ण आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि ऑस्ट्रेलियात तापमानाचा पारा लक्षणीयरीत्या वाढेल. दक्षिण आफ्रिका, मध्य अमेरिकेचा दक्षिण भाग आणि कॅरेबियन बेटांवर अत्यंत कमी पावसामुळे भीषण दुष्काळाची स्थिती निर्माण होईल. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार व मदतप्रमुखांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, या नैसर्गिक आपत्तीमुळे एकट्या आफ्रिकेत सुमारे ५ कोटी लोकांना भीषण अन्नटंचाई आणि उपासमारीचा सामना करावा लागू शकतो.

आफ्रिकन विकास बँकेच्या अंदाजानुसार, आफ्रिकन देशांचे १० ते २० अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान होऊन त्यांचा जीडीपी १ ते २ टक्क्यांनी घसरण्याची भीती आहे, आणि एकूणच आफ्रिका खंडाला ५० अब्ज डॉलर्सपर्यंतचा प्रचंड मोठा फटका बसू शकतो.

या सर्व हवामान संकटामुळे पिकांचे प्रचंड नुकसान होऊन जागतिक स्तरावर अन्नधान्य आणि पिण्याच्या पाण्याचा भयानक तुटवडा निर्माण होईल. अगोदरच आंतरराष्ट्रीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. त्यात या एल निनोच्या संकटाची भर पडल्याने अन्न, इंधन आणि खतांचे दर मोठ्या प्रमाणावर भडकतील असा गंभीर इशारा संयुक्त राष्ट्रांनी दिला आहे.

या पार्श्वभूमीवर, संयुक्त राष्ट्रांच्या मदत कार्य विभागाने तातडीच्या उपाययोजना सुचवत मध्य व दक्षिण अमेरिकेतील नागरिकांसाठी उपजीविकेचे पयार्यी मार्ग निर्माण करण्याचे, आफ्रिकेत पिके व बियाणे सुरक्षित ठिकाणी साठवण्याचे आणि आग्नेय आशियात आगामी पूर व चक्रीवादळांचा सामना करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. निसगार्तील या बदलांचा वेग आणि त्याची व्याप्ती पाहता, महासागरांच्या तापमानातील अगदी किरकोळ वाढही संपूर्ण मानवी संस्कृती, जागतिक अर्थव्यवस्था आणि पृथ्वीवरील जीवसृष्टीला कसा विळखा घालू शकते, याचे हे एक अत्यंत भयंकर आणि डोळ्यात अंजन घालणारे वास्तव आहे. वेळीच योग्य पावले न उचलल्यास याचे कायमस्वरूपी विनाशकारी परिणाम संपूर्ण मानवजातीला भोगावे लागतील.

- ९५६१५९४३०६

दुसऱ्या टि-२० मध्येही भारतीय महिलांनी झिंबाब्वेला चिरडले

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय महिला संघाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेचा १२१ धावांनी पराभव केला. वडोदरा येथील कोटंबी स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना भारताने ५० षटकांत ६ गडी गमावून ३२८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, झिम्बाब्वेचा संघ ४८.५ षटकांत २०७ धावांवर सर्वबाद झाला. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली. मालिकेतील तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना २८ ऑक्टोबर रोजी खेळला जाईल. भारताकडून हरमनप्रीत कौरने १२१ चेंडूंमध्ये १२६ धावा केल्या. दीप्ती शर्माने ८६ चेंडूंमध्ये १०६ धावांची नाबाद खेळी केली. गोलंदाजीत, २० वर्षीय डावखुरी फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्माने३९ धावांत ४ बळी घेतले. दीप्तीनेही ३ बळी घेतले. शतक झळकावल्यानंतर हरमनप्रीत कौरला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. १९ धावांत दोन गडी बाद झाले, त्यानंतर हरमनप्रीत आणि दीप्तीने सूत्रे हाती घेतली.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण त्यांची सुरुवात खराब झाली. कर्णधार स्मृती मंधाना दोन चेंडूंमध्ये शून्यावर बाद झाली. शफाली वर्मासुद्धा ८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. तिसरे षटक संपण्यापूर्वी भारताच्या धावसंख्येत २ गडी बाद १९ धावा झाल्या होत्या.

त्यानंतर प्रतिका रावल आणि हरमनप्रीत कौर यांनी तिसऱ्या विकेटसाठी १२४ धावांची भागीदारी केली. प्रतिकाने ६७ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. ती बाद झाल्यानंतरही हरमनप्रीतने डाव सावरला. तिने दीप्ती शमासोबत पाचव्या विकेटसाठी १५३ धावांची भागीदारी केली. हरमनप्रीतने १५ चौकारांच्या मदतीने १२६ धावा केल्या. तिच्या एकदिवसीय कारकिर्दीतील हे तिचे आठवे शतक होते. दीप्तीने १५ चौकारांसह नाबाद १०६ धावा केल्या. तिने ३७ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले आणि शेवटच्या षटकात आपले शतक पूर्ण केले.

प्रतिका रावल आणि हरमनप्रीत सिंग यांच्या ११८ चेंडूंमध्ये १२४ धावांची भागीदारी

झिम्बाब्वेने चांगली सुरुवात केली, पण त्यानंतर नियमित अंतराने विकेट गमावल्या. ३२९ धावांचा पाठलाग करताना, झिम्बाब्वेने सकारात्मक सुरुवात केली. २० षटकांच्या अखेरीस संघाची धावसंख्या १ गडी बाद १०४ होती. सलामीवीर मॉडेस्टर मुपाचिकवाने ७० चेंडूंमध्ये ४९ धावा केल्या. चिपो मुगेरी-तिरिपानोने ५७ चेंडूंमध्ये ४६ धावांची भर घातली. या दोघींनी सुरुवातीचा दबाव कमी केला आणि भारताला लवकर विकेट घेण्यापासून रोखले. पण दुसरी विकेट पडल्यानंतर, झिम्बाब्वेचा डाव मंदावला. चिपो १०७ धावांवर बाद झाला. १२० धावांवर असताना मुपाचिकवा तिसऱ्या विकेटसाठी परत आला. त्यानंतर भारताच्या फिरकी गोलंदाजांनी फलंदाजांना मोकळेपणाने खेळू दिले नाही. वैष्णवी शर्माने १० षटकांत ४ बळी घेऊन सामन्याचे चित्रच पालटले.

वैष्णवी शर्माने १० षटकांत ३९ धावा देऊन ४ बळी घेतले, ज्यात एका निर्धाव षटकाचा समावेश होता. वैष्णवीने बिलोव्हेड बिझाला पायचीत केले. त्यानंतर तिने कर्णधार जोसेफिन न्कोमोलाही त्याच पद्धतीने बाद केले. तिची पुढची विकेट मिशेल मावुंगा होती, जिला तिने त्रिफळाचीत केले. खेळपट्टीवर पडल्यानंतर चेंडू स्विंग झाला आणि ऑफ स्टंपला लागला. सामन्यानंतर वैष्णवीने या विकेटला आपली आवडती विकेट म्हटले. चौथी विकेट मॉडेस्टर मुपाचिकवा होती, जी ४९ धावांवर बाद झाली. वैष्णवी व्यतिरिक्त, दीप्ती शर्मानेही गोलंदाजीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. तिने ९ षटकांत ३२ धावा देऊन ३ बळी घेतले.

दीप्ती शर्माचे तीन विश्वविक्रम

भारतीय महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सहाव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावणारी दीप्ती शर्मा ही पहिली खेळाडू ठरली आहे. यापूर्वी, या स्थानावर भारतासाठी सर्वोच्च धावसंख्या रिचा घोषच्या नावावर होती, जिने गेल्या वर्षी विशाखापट्टणम येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ९४ धावा केल्या होत्या. दीप्तीचे ८३ चेंडूंतील शतक हे चेंडूंच्या संख्येनुसार भारतीय महिला संघासाठी पाचवे सर्वात वेगवान एकदिवसीय शतक आहे. या यादीत २०२५ मध्ये दिल्लीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध स्मृती मंधानाने ५० चेंडूंमध्ये केलेले शतक अव्वल स्थानी आहे. हरमनप्रीत आणि दीप्तीची १५३ धावांची भागीदारी ही भारतीय महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये पाचव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावरील सर्वोच्च भागीदारी ठरली आहे. यापूर्वी हा विक्रम स्नेह राणा आणि पूजा वस्त्रकार यांच्या नावावर होता, ज्यांनी २०२२ च्या विश्वचषकात पाकिस्तानविरुद्ध १२२ धावा जोडल्या होत्या.

एकंदर भारतीय महिलांचा एकूण फॉर्म व आत्मविश्वास बघता टि ट्वेंटी मालिकेतील क्लिन स्विप नंतर वनडे मालिकेतही झिंबाब्वेला व्हॉईट वॉशचा सामना करावा लागण्याचीच शक्यता अधिक दिसते. या झिंबाब्वे विरुद्धच्या मालिकेत माजी कर्णधार हरमनप्रितची बॅट जरा जास्तच बोलायला लागली. कर्णधार पदातून मुक्त झाल्याचाच हा परिणाम असल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट जाणवत आहे. तर त्या उलट एरव्ही भरपूर फॉर्मात चालणारी नूतन कर्णधार स्मृती मंधाना जरा फलंदाजीत अडखळत असल्याचे दिसते. परंतु तिची क्षमता बघता सर्व दबाब ती झुगारून आपल्या जुन्या लयीत परतायला फारसा वेळ घेणार नाही असा विश्वास वाटतो.

- ९०९६३७२०८२

जागतिक विकास समस्यांवर लोकांचे लक्ष वेधावे

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

दरवर्षी २४ ऑक्टोबर रोजी जगभरात जागतिक विकास माहिती दिन साजरा केला जातो. मुख्य माहिती व इतिहासः उद्देशः जागतिक विकासाच्या समस्यांकडे लोकांचे लक्ष वेधणे आणि त्यावर मात करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य व जनजागृती वाढवणे हा या दिवसाचा मूळ उद्देश आहे. सुरुवातः संयुक्त राष्ट्र महासभेने सन १९७२ मध्ये या दिवसाची स्थापना केली. तारीख निवडः हा दिवस संयुक्त राष्ट्र दिनासोबत (२४ ऑक्टोबर) जोडलेला आहे, जेणेकरून विकासाचे प्रश्न आणि आंतरराष्ट्रीय धोरणे लोकांपर्यंत पोहोचवता येतील. तंत्रज्ञानाची भूमिकाः जागतिक विकासात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची-आईसीटी भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. वेळेवर मिळणारी योग्य माहिती विकासातील मोठे अडथळे दूर करण्यास मदत करते. जनमत तयार करणेः विकसनशील आणि विकसित देशांमधील आर्थिक तसेच सामाजिक प्रगतीला गती देण्यासाठी तरुणांमध्ये व समाजात माहितीचा प्रसार करणे, हा याद्वारे प्रयत्न केला जातो. सन १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने २४ ऑक्टोबर रोजी संयुक्त राष्ट्र दिनासोबतच जागतिक विकास माहिती दिन सुरू करण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी विकासाच्या समस्यांकडे आणि त्या सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मजबूत करण्याच्या गरजेकडे जागतिक जनमताचे लक्ष वेधणे हा महासभेचा उद्देश होता. सन १९७० मध्ये दुसऱ्या राष्ट्र विकास दशकासाठी आंतरराष्ट्रीय विकास धोरण स्वीकारण्यात आले, म्हणूनही हा दिवस ओळखला जाऊ लागला. दि. १७ मे १९७२ रोजी व्यापार आणि विकासावरील संयुक्त राष्ट्र परिषदेने व्यापार आणि विकासाच्या समस्यांसंबंधी माहितीचा प्रसार आणि जनमत संघटित करण्यासाठी उपाययोजना प्रस्तावित केल्या . या उपाययोजना ठराव ३०३८ म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या, जो दि.१९ डिसेंबर १९७२ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने मंजूर केला. या ठरावात जगभरातील लोकांचे लक्ष विकासाच्या समस्यांकडे वेधण्यास मदत करण्यासाठी जागतिक विकास माहिती दिन सुरू करण्याचे आवाहन करण्यात आले. या समस्यांचे निराकरण करण्याचे मार्ग शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य का मजबूत करणे आवश्यक आहे? हे सर्वसामान्यांना समजावून सांगणे हा या कार्यक्रमाचा आणखी एक उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात विकासाच्या मध्यवर्ती भूमिकेवर जोर देण्यासाठी हा दिवस संयुक्त राष्ट्र दिनासोबतच साजरा केला जावा, असेही महासभेने ठरवले. जागतिक विकास माहिती दिन प्रथम दि. २४ ऑक्टोबर १९७३ रोजी आयोजित करण्यात आला आणि तेव्हापासून दरवर्षी याच तारखेला तो साजरा केला जातो.

अलिकडच्या वर्षांत अनेक कार्यक्रमांनी या दिवसाच्या शीर्षकाचा थोडा वेगळा अर्थ लावला आहे. व्यापार आणि विकासाच्या समस्यांविषयी लोकांना जागरूक करण्यात आणि त्यावर उपाय शोधण्यात इंटरनेट आणि डिजिटल दरीमुक्त मोबाईल फोन यांसारखी आधुनिक माहिती-तंत्रज्ञानं कोणती भूमिका बजावू शकतात, यावर या कार्यक्रमांनी लक्ष केंद्रित केले आहे. जागतिक विकास माहिती दिनाच्या विशिष्ट उद्दिष्टांपैकी एक म्हणजे तरुणांना माहिती देणे आणि त्यांना प्रेरित करणे हे होते आणि हा बदल हे उद्दिष्ट पुढे नेण्यास मदत करू शकतो. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

पदवीधर निवडणूक रद्द करण्यासंदर्भात याचिकेवर आज मतमोजणीच्या दिवशीच सुनावणी?

८४०० दुबार मतदार, डिप्लोमा व डिफार्म यादीत सामील न्याय न मिळाल्यास सर्वोच्च न्यायालयात जाणार : प्रा. सचिन काळबांडे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीतील कथित अनियमितते विरोधात प्रा.सचिन शंकरराव काळबांडे नागपूर यांनी दाखल केलेल्या याचिकेला महत्त्वाचे वळण मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींसमोर सुनावणीनंतर हे प्रकरण पुन्हा नागपूर खंडपीठात वर्ग करण्यात आल्याची माहिती याचिकाकर्त्यांनी दिली. उद्या,



मंगळवार दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणीच्या दिवशी या याचिकेवर तातडीने सुनावणी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याचिकेत नागपूर विभागातील ९८ हजार ७८२ अर्ज उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटच्या मुदतीपर्यंत प्रलंबित असल्याचा दावा करण्यात आला .अंतिम मतदार यादी, अर्जांची छाननी आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत याचिकाकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. ८४०० मतदान दुबार नोंदणी झालेल्या आहे. डिप्लोमा व डिफार्म मान्यता नसताना यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. अंतिम यादी डिसेंबर २०२५ मध्ये प्रकाशित करण्यात आली असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला, तसा ऑर्डर मध्ये नमूद करण्यात आला आहे. दुसरीकडे रचना इंदुरकर निवडणूक अधिकारी ह्या सांगतात की,अंतिम यादी नेमकी कधी प्रकाशित होईल हे सांगता नाही, काम सुरू आहे असे १० ऑक्टोबर ला सांगतात. खरे कोण बोलत आहे आणि खोटे कोण, हाच प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे सदर निवडणूक ही बोगस मतदार यादीवर झालेली आहे म्हणून ही निवडणूक रद्द करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

न्याय न मिळाल्यास सर्वोच्च न्यायालयात जाणार, असा इशारा प्रा.सचिन काळबांडे यांनी दिला. आता नागपूर खंडपीठाच्या मतमोजणीच्या दिवशीच असलेल्या सुनावणीकडे पदवीधर मतदार आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अशी माहिती काळबांडे यांनी दिली.

थोडक्यात

सन्मित्र सभेचा कोजागिरी उत्सव २८ ऑक्टोबरला

शिवाजी सभागृहाच्या प्रांगणात विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम, प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांची प्रमुख उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सन्मित्र सभेच्या सदस्यांचा कोजागिरी उत्सव बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने शिवाजी सभागृहाच्या प्रांगणात सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला ख्यातनाम शेफ आणि कलाकार विष्णू मनोहर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कोजागिरी उत्सवाच्या निमित्ताने सभेच्या सदस्यांना एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी मिळणार आहे. विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांमुळे उत्सवात रंगत निर्माण होणार आहे. सन्मित्र सभेचे अध्यक्ष अनिल शेंडे आणि सचिव वृषाली शिलेदार यांनी सभेच्या सर्व सदस्यांना या विशेष कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सर्व सदस्यांनी उत्सवात सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

पदवीधर निवडणुकीची आज मतमोजणी, उमेदवारांचे समर्थकांचा उत्साह शिगेला



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

विधान परिषदेच्या पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी अरोली येथील मतदान केंद्र(बूथ) क्रमांक ४३ वर ३७० पैकी २६१ मतदारांनी मतदान केले. अरोली येथे ७०.५४%, खात येथे ७६.७०%, मौदा येथील दोन मतदान केंद्रात अनुक्रमे ७८.९८% व७२.३७%मतदान झाले . मौदा तालुक्यात एकूण १९१० पदवीधर मतदार आहेत.अत्यंत शांततेत आणि सुरळीतपणे मतदान पार पडले. उद्या मंगळवार (ता. २७ ऑक्टोबर)ला मतमोजणीला सुरुवात होणार आहे. तालुक्यात पदवीधर मतदार भरभरून मतदानासाठी बाहेर पडल्याने उमेदवारांचे समर्थकांचा उत्साह शिगेला पोहोचलेला आहे.

अरोली येथील महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या समर्थनात लावलेल्या बूथवर त्यांचे समर्थक महायुतीचे नेते राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, चाचेर मंडळ अध्यक्ष रवी चव्हाण,शिवसेना तालुकाध्यक्ष प्रशांत भुरे, मौदा नगरपंचायत नगराध्यक्ष प्रसन्ना (राजा) तिडके, चाचेर- निमखेडा जि प क्षेत्रातील भाजपचे भावी उमेदवार भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संजू वाघमारे, पंचायत समिती माजी उपसभापती खेमराज चाफले, सामाजिक कार्यकर्ते पंढरी कडू, अरोली सर्कलचे भाजप नेते सदानंद निमकर,विष्णू देशमुख, रोशन उमप, कैलास समरीत, कोदामेंढी उपसरपंच गोपाल गिरमेकर सह महायुतीचे अनेक पदाधिकाऱ्यांनी भेटी दिल्या.

आजपासून ऑक्टोबरपासून संविधान चौकात उपोषण व साखळी उपोषणाचा एल्गार, अनुसूचित जातींप्रमाणे समान सुविधा देण्याची मागणी

ऐतिहासिक पुरावे आणि समित्यांच्या शिफारशी असूनही धोबी (परीट) समाज आरक्षणाच्या सुविधांपासून वंचित

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्रातील धोबी (परीट) समाजाला आरक्षणासंबंधी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी समाजाच्यावतीने २७ ऑक्टोबर पासून संविधान चौकात उपोषण आणि साखळी उपोषण सुरू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. धोबी समाजाचा अनुसूचित जातींच्या यादीत समावेश होईपर्यंत राज्य सरकारने विशेष बाब म्हणून अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणाच्या सोयी-सुविधांप्रमाणे समान लाभ द्यावेत, अशी समाजाची प्रमुख मागणी आहे.



समाजाच्या वतीने सांगण्यात आले की, महाराष्ट्र शासनाने ५ सप्टेंबर २००१ रोजी माजी मंत्री डॉ.डी.एम. भांडे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती स्थापन केली होती. या समितीने धोबी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास केला. समितीने धोबी तसेच परीट, वरठी, रजक, वढ्ढी, मडवळ, मडलेवार आणि धोबा या तत्सम जातींचा अनुसूचित जातींमध्ये समावेश करण्याची शिफारस केली होती. तसेच समावेश होईपर्यंत विशेष तरतुदीद्वारे राज्य शासनाने समान सुविधा देण्याची शिफारसही करण्यात आली होती.

समाजाच्या दाव्यानुसार, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी भंडारा आणि बुलढाणा जिल्ह्यातील धोबी समाजाला अनुसूचित जातींच्या सवलती मिळत होत्या. मात्र, १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर या सवलती बंद करण्यात आल्या.

समाजाची सामाजिक परिस्थिती आणि पारंपरिक व्यवसायात मूलभूत बदल झालेला नसतानाही या सुविधा बंद झाल्याचे समाजाचे म्हणणे आहे. तसेच १९७६ मध्ये अनुसूचित जाती-जमातींसाठी क्षेत्रीय बंधने हटविण्यात आल्यानंतरही धोबी समाजाचा प्रश्न प्रलंबित राहिल्याचा दावा करण्यात येत आहे. राज्य सरकारने मराठा आणि धनगर समाजासाठी लागू केलेल्या समकक्ष सुविधांच्या धर्तीवर धोबी-परीट समाजासाठी स्वतंत्र शासन निर्णय (जीआर) काढावा, अशी आंदोलन कर्त्यांची मागणी आहे.

ऐतिहासिक कागदपत्रे, डॉ. भांडे समितीच्या शिफारशी आणि संबंधित अहवालांचा विचार करून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. शिक्षण, रोजगार आणि इतर शासकीय योजनांमध्ये समाजाला समान संधी मिळावी, हा या आंदोलना मागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

नागपूर शहरातील एकल महिलांनी ऑनलाईन सर्वेक्षण व नोंदणी करावी!

महापौर अन् आयुक्त यांचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाच्या निदेशांनुसार एकल महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने राज्यातील सर्व महानगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण व नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. ही नोंदणी महत्त्वपूर्ण असून, नागपूर शहरातील सर्व एकल महिलांनी सदर ऑनलाईन सर्वेक्षणात सहभाग नोंदवून आपली संपूर्ण माहिती अचूकपणे भरून नोंदणी करावी, असे आवाहन महापौर निता ठाकरे व आयुक्त डॉ. विपीन यांनी केले आहे.



नागपूर महानगरपालिकेमार्फत नागपूर शहरातील एकल महिलांचे सर्वेक्षण व नोंदणी घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने करता यावी, यासाठी नागपूर महानगरपालिके मार्फत ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकल महिला सर्वेक्षण नोंदणी Link - http://admin-dept-portal. emergent. host या संकेतस्थळावर करता येईल. नागपूर शहरातील सर्व एकल महिलांनी सदर ऑनलाईन लिंकवर जाऊन आपली माहिती भरून नोंदणी करून घ्यावी. एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शासकीय योजनांशी संबंधित सक्षमीकरणासाठी ही नोंदणी महत्त्वपूर्ण असून, एकल महिलांनी या उपक्रमास सहकार्य करून आपली नोंदणी पूर्ण करावी. नागपूर शहरातील सर्व एकल महिलांनी या संधीचा लाभ घेऊन लवकरात लवकर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन महापौर निता ठाकरे व आयुक्त डॉ. विपीन यांनी केले आहे.

काचूरवाही येथे 'माझा आवाज' केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

लहान गटात जैद शेख, मध्यम गटात कार्तिकी घरजाळे, तर मोठ्या गटात जीविका चौधरी प्रथम

दै. सिंहवाणी वृत्त, काचूरवाही

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या वक्तृत्वकलेला वाव मिळावा, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता विकसित व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, काचूरवाही येथे माझा आवाज केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. केंद्रप्रमुख आदरणीय कोवाचे यांच्या उपस्थितीत ही स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या वक्तृत्वकौशल्याचे दर्शन घडविले.

या स्पर्धेमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी या लहान गटातून एकूण १४ शाळांनी सहभाग घेतला. इयत्ता सहावी ते आठवी या मध्यम गटातून सात शाळा, तर



इयत्ता नववी ते दहावी या मोठ्या गटातून दोन शाळांनी सहभाग नोंदविला. विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी आपले विचार स्पष्टपणे आणि आत्मविश्वासाने मांडत उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी नवरगाव येथील नरेंद्र डबीर, गजानन राऊत सर आणि जैस्वाल विद्यालय, काचूरवाही येथील सौ. माया पद्माकर मुसळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातील आशय, वक्तृत्वशैली, आत्मविश्वास, उच्चार आणि विषय मांडण्याची पद्धत या बाबींच्या आधारे गुणांकन केले.

तिन्ही गटांतील विजेते

या केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता तिसरी ते पाचवी या गटातून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, काचूरवाही येथील जैद मिराज शेख याने प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता सहावी ते आठवी या गटातून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, लोहडोंगरी येथील कार्तिकी राजकुमार घरजाळे हिने प्रथम क्रमांक मिळविला. तर इयत्ता नववी ते दहावी या गटातून स्व. एड्. नंदकिशोर जैस्वाल माध्यमिक विद्यालय, काचूरवाही येथील जीविका किशोर चौधरी हिने प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपले विचार निर्भीडपणे मांडण्याची संधी मिळाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, तसेच त्यांच्यातील सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धांचे आयोजन महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

केंद्रस्तरीय माझा आवाज वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्याला प्रोत्साहन मिळाले असून, विजेत्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी व चष्म्यांचे वाटप करणार, माजी आमदार सुधीर पारवे यांचा उपक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

माजी आमदार सुधीर पारवे यांच्या पुढाकारातून सुधीर पारवे फाउंडेशन तथा लक्ष्मणा बहुउद्देशीय संस्था, भिवापूर यांच्या वतीने तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करण्यात येणार आहे. दृष्टीदोष असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना चष्म्यांचे वाटप, तसेच तिरळेपणाची समस्या असलेल्या विद्यार्थ्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत उपचारांची व्यवस्था केली जाणार आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी सोमवारी (२६ ऑक्टोबर) पंचायत समिती सभागृहात बैठक झाली. यावेळी आरोग्य व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी उपक्रमाच्या अंमलबजावणीवर चर्चा केली. तालुक्यातील शाळांमध्ये जिल्हा परिषद सर्कलनिहाय हा उपक्रम राबविण्याचे ठरले. बैठकीला सहायक गटविकास अधिकारी भोगे, भाजपचे ग्रामीण अध्यक्ष सुधाकर पडोळे, निलीमा नागोसे, रामकृष्ण खांबाळकर यांच्यासह आरोग्य व शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

मनोज भालचंद्र वासनिक यांचे निधन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पांढराबोडी येथील निवासी मनोज भालचंद्र वासनिक यांचे सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी आकस्मिक निधन झाले. मृत्युसमयी ते ४५ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता पांढराबोडी येथील निवासस्थानावरून निघणार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचे पश्चात भरपूर मोठा परिवार आहे.

राजू राममूरत यादव का निधन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राजू राममूरत यादव का निधन ३८ वर्ष की उम्र मे हुआ. रमाईनगर नारी रोड नागपुर निवासी राजू राममूरत यादव का आकस्मिक निधन हो गया । इनकी अंतीम यात्रा २७ अक्टूबर को दोपहर २ बजे इनके निवास से नारी घाट जाऐगी।

महात्मा फुले शिक्षण संस्थेतर्फे द्विशताब्दी जयंती महोत्सव संपन्न

'जोतिबांची सावली... सावित्री माऊली...' नाटक आणि कवी संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग, नागपूर यांच्या वतीने आयोजित द्विशताब्दी जयंती महोत्सव रविवार, २५ ऑक्टोबर रोजी उत्साहात संपन्न झाला. रेशीमबाग चौकातील महात्मा फुले सांस्कृतिक सभागृहात आयोजित या महोत्सवाला साहित्यप्रेमी, नाट्यरसिक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महोत्सवात ऐतिहासिक सत्यावर आधारित दोन अंकी संघर्षमय



नाटक 'जोतिबांची सावली... सावित्री माऊली...' सादर करण्यात आले. या नाटकातून महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा, सामाजिक संघर्षाचा तसेच स्त्रीशिक्षण आणि समतेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा प्रभावी आविष्कार घडविण्यात आला. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या भूमिकेत प्रा. जयकुमार चर्जन, तर सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत अपूर्वा सोनार यांनी प्रभावी अभिनय केला. नाटकाची निर्मिती, लेखन आणि दिग्दर्शनही अपूर्वा सोनार यांनी केले.

यानिमित्त आयोजित कवी संमेलनाने महोत्सवात साहित्यिक रंग भरले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अरुण पवार होते, तर नामवंत साहित्यिक डॉ. सुनीता जुलमे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या मुख्य संयोजक प्रा. डॉ. अलका झाडे यांनी या महोत्सवाच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

कवी संमेलनात सहभागी कवींनी आपल्या कवितांमधून महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा, सामाजिक समतेचा, स्त्रीशिक्षणाचा आणि परिवर्तनवादी चळवळीचा संदेश प्रभावीपणे मांडला. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवयित्री मंजुषा कऊटकर यांनी केले. प्रसिद्ध गझलकार विजय वासाडे, प्रख्यात कवी लीलाधर दवंडे आणि मीनल येवले यांनी आपल्या दर्जेदार काव्य सादरीकरणातून संमेलनाला वेगळी उंची प्राप्त करून दिली.

या कवी संमेलनात कीर्ती लंगडे, शीतल कांडलकर, सुनीता श्रीखंडे, प्राजक्ता वाल्होकार, प्रा. अर्चना डांगोरे, वसुधा येनकर, रचना कन्हेर, डॉ. संगीता बानाईत, मायाताई जोगे, धनश्री पाटील, शैल जेमिनी कडू, डॉ. पुष्पा तायडे, निमा बोडखे, देवल आढाव, डॉ. प्रेमा लेकुरवाळे, शंकर चिमोटे आणि जयंत झंझाड यांनी आपल्या कविता सादर केल्या. विविध विषयांवरील कवितांनी उपस्थित रसिकांची दाद मिळवली. या कार्यक्रमाला राधेश्याम खवले तसेच प्रसिद्ध समीक्षक प्रभाकर तांडेकर यांची विशेष उपस्थिती होती.

नाटक आणि कवी संमेलनाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. सामाजिक समता, शिक्षण, विवेकनिष्ठ विचार आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारा हा महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

थोडक्यात

इतवारी पेठेतील जलवाहिनीची गळती दुरुस्त, नियमित शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी नगर परिषद सज्ज

हॉटेल डी मर्सीजवळ दुरुस्तीचे काम पूर्ण, नागरिकांनी सुरुवातीचे पाणी वापरताना घ्यावी काळजी



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड-मनिष शिंगणे

उमरेड शहरातील इतवारी झोन, इतवारी पेठ परिसरात २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी झालेल्या पाणीपुरवठ्यात दूषित, काळसर व दुर्गंधीयुक्त पाणी आल्याने नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली. या प्रकाराची दखल घेत नगर परिषद पाणीपुरवठा विभागाने हॉटेल डी मर्सीजवळील पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिनीची गळती दुरुस्त करण्याचे काम पूर्ण केले आहे. संबंधित विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २७ ऑक्टोबर रोजी मंगळवारी सायंकाळी ७ वाजल्यानंतर इतवारी पेठेतील राम मंदिर परिसरासह संबंधित भागात काही वेळासाठी पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. जलवाहिनीची दुरुस्ती पूर्ण झाल्याने पुढील काळात नेहमीप्रमाणे नियमित व शुद्ध पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे.

दरम्यान, दूषित पाण्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी स्वच्छ दिसत असले तरी खबरदारी म्हणून ते उकळून व थंड करूनच पिण्यासाठी वापरावे. पाण्याचा रंग किंवा दुर्गंधी कायम असल्यास संबंधित पाणीपुरवठा विभागाला त्वरित कळवावे, असे आवाहन करण्यात येत आहे. जलवाहिनीची गळती दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या दिशेने नगर परिषदेकडून कार्यवाही करण्यात आली असून, नागरिकांना सुरक्षित पाणी मिळण्यासाठी पुढील पुरवठ्याच्या गुणवत्तेची खात्री करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

'हिंदी चित्रपट संगीताचे चालते-बोलते ज्ञानकोश' बिश्वनाथ चॅटर्जी यांचा २९ ऑक्टोबरला गौरव

विदर्भ साहित्य संघ आणि राष्ट्रभाषा परिवाराचा संयुक्त उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

हिंदी चित्रपट संगीताचा इतिहास, त्यातील गाणी, गायक, संगीतकार, गीतकार आणि वादक यांच्याविषयी दुर्मीळ व अचूक



संदर्भांचे जतन करणारे ज्येष्ठ चित्रपट संगीत अभ्यासक बिश्वनाथ चॅटर्जी यांचा विशेष गौरव सोहळा गुरुवार, २९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. विदर्भ साहित्य संघ आणि राष्ट्रभाषा परिवार, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ५.३० वाजता शंकरनगर येथील वोक्हार्ट हॉस्पिटलच्या मागे असलेल्या श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृहात हा कार्यक्रम होईल. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. स. जोग राहणार असून, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी आणि राष्ट्रभाषा परिवाराचे सचिव सुरेशबाबू अग्रवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

धर्म, पंथ आणि प्रांतांच्या सीमा ओलांडून भारतीयांना जोडणारा हिंदी चित्रपट संगीताचा धागा बिश्वनाथ चॅटर्जी यांनी आयुष्यभर जपला आहे. हिंदी चित्रपट संगीताच्या अभ्यासासाठी त्यांनी केलेले कार्य म्हणजे संगीताच्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करणारा अमूल्य ठेवा आहे. १९३० ते १९८५ या कालखंडातील हिंदी चित्रपट गीतांच्या सहा खंडांच्या कोशांमध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यातील पाचव्या खंडाचे लेखन त्यांनी केले असून, अन्य खंडांच्या निर्मितीतही त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. चित्रपट संगीताच्या क्षेत्रातील अनेक दुर्मीळ संदर्भ, गाण्यांच्या ध्वनिमुद्रणामागील तपशील आणि कलाकारांच्या योगदानाची माहिती त्यांनी अथक परिश्रमांतून संकलित करणारे बिश्वनाथ चॅटर्जी हे हिंदी चित्रपट संगीताचे चालते-बोलते ज्ञानकोश आहे. संगीताच्या या समृद्ध वारशाचे जतन करणाऱ्या चॅटर्जी यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित या सोहळ्याला साहित्यप्रेमी, संगीतप्रेमी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्वरूप शालिग्राम यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



स्वरूप शरदचंद्र शालिग्राम (वय ५८) यांचे २५ ऑक्टोबर रोजी रात्री ९.५० वाजता नागपूर येथील गांधी नगर परिसरातील शरयू अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक ३६० येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्यावर २६ ऑक्टोबर रोजी अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी सोनल, मुलगी तन्वी, मुलगा सोहम आणि बहीण सोनिया नायगावकर असा परिवार आहे.

सावनेर येथे राजर्षी शाहू महाराज पुतळ्याचे अनावरण, आजपासून वर्षावास समापन सोहळा

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गुरू राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण येत्या २८ ऑक्टोबर या तारखेला सावनेर येथील

पंचशील बुध्द विहार येथे महापंथ महास्थविर भंदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई (जापान) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा अध्यक्षानी भंदन्त धम्मसेन महास्थविर राजगिरी बुध्द विहार येणीकोनी असतील. तर परीत्रण पाठ भिक्षुनी थुलनंदा थेरी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी भंदन्त शिलरक्षीत महाथेरो यांच्या अठ्ठावीस व्या वर्षावास सोहळ्याचे समापण सोहळा देखील भंन्दत सुरई ससाई यांच्या हस्ते पार पडणार आहे. रोज मंगळवारला ध्वजारोहण परित्राण पाठ धम्मदेशना व धम्म प्रवचन बुधवार रोजी राजे शाहू महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण संपन्न होणार आहे.

मराठीतील संकुचित वृत्ती नष्ट व्हावी!

डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे परखड मत, विदर्भ सांस्कृतिक प्रबोधिनी व स्पंदन संस्थेतर्फे ज्येष्ठ साहित्यिकांचा सन्मान



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर मराठी साहित्यिकांनी प्राचीन काळापासून भाषा आणि संस्कृतीचा देशभर विस्तार केला. इतर भारतीय भाषांच्या समृद्धीतही मराठी साहित्यिकांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. मात्र, मराठी माणसाच्या संकुचित वृत्तीमुळे मराठी भाषेचे अवमूल्यन झाले. ही वृत्ती नष्ट करून आपला साहित्यिक आणि सांस्कृतिक इतिहास स्वाभिमानाने सांगण्याची गरज आहे, असे परखड प्रतिपादन ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले.

विदर्भ सांस्कृतिक प्रबोधिनी आणि स्पंदन कल्याणकारी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सोमवारी आयोजित कार्यक्रमात डॉ. नेमाडे यांचा ह्रद्य सत्कार करण्यात आला. यावेळी स्पंदन संस्थेच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरणही त्यांच्या हस्ते झाले. 'मराठी भाषेची सद्यःस्थिती' या विषयावर बोलताना त्यांनी मराठीच्या समृद्ध साहित्यपरंपरेपासून ते भाषेसमोरील वर्तमान आव्हानांपर्यंत विविध मुद्द्यांवर भाष्य केले.

डॉ. नेमाडे म्हणाले, गजानन मुक्तिबोध, भागवत साठे, कविश्वर यांच्यासारख्या मराठी साहित्यिकांनी देशातील अन्य भाषांच्या समृद्धीत योगदान दिले. महानुभाव साहित्य देशभर पोहोचविण्यात नागपूरचे डॉ. व्ही. बी. कोलते यांची भूमिका महत्त्वाची ठरली. मराठी साहित्याचा प्रभाव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून त्याची परंपरा व्यापक आहे. त्यामुळे मराठी भाषेचा इतिहास आणि तिचे योगदान मांडताना न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने पुढे आले पाहिजे.

आज आपण ज्या इंग्रजी भाषेचा मोठ्या प्रमाणावर उदोउदो करतो, त्या भाषेचे स्वतंत्र अस्तित्व आकाराला येण्यापूर्वीच महाराष्ट्रात कविता आणि कादंबऱ्यांची समृद्ध परंपरा विकसित झाली होती, असे त्यांनी नमूद केले. मराठी ही अपभ्रंश भाषा असल्याचा समजही मराठीला कमी लेखण्याच्या दृष्टिकोनातून पसरविण्यात आल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मराठीच्या भरभराटीत नागपूरचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून महाराष्ट्राच्या प्रगतीतही या शहराची भूमिका निर्णायक राहील, अशा शब्दांत डॉ. नेमाडे यांनी नागपूरचा गौरव केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पंदन संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग सोनवणे यांनी केले. डॉ. नेमाडे यांच्या सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक डॉ. श्रीपाद जोशी यांनी केले. यावेळी डॉ. श्रीपाद जोशी यांचाही डॉ. नेमाडे यांच्या हस्ते 'कृतार्थ जीवन गौरव' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शरद निंबाळकर होते, तर उद्घाटक म्हणून पद्मश्री डॉ. रवी कोल्हे उपस्थित होते.

पुरस्कारांचे वितरण

डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार श्याम पेठकर, दै. तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे, लोकनाथ यशवंत, डॉ. सुभाष गवई, डॉ. प्रफुल्ल शिलेदार, ज्ञानेश्वर रक्षक, अनिल मालोकर, प्रभाकर आंबोणे, डॉ. बळवंत भोयर, डॉ. नीलकांत कुलसंगे, गुरू कौशल आणि धनराज हरडे यांना स्पंदन संस्कृती-साहित्य कृतार्थ जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच प्रतापराव वाघमारे, श्रीमंत माने, देवा झिंझाड, सुनीता झाडे, रवींद्र भुयार, कल्याणकुमार डहाट, संजय जीवने, नानू नेवरे आणि सीताराम राऊत यांना स्पंदन साहित्य-संस्कृती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले.

डॉ. आशीष मुजुमदार यांचे 'गझल-आख्यान' उद्या

अरुणाई आणि सप्तक यांचा संयुक्त उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : गझलेचे तंत्र, सौंदर्य, संगीत रचना आणि गायकी यांचा रंजक पद्धतीने उलगडा करणारा गझल-आख्यान हा विशेष कार्यक्रम बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. प्रसिद्ध संगीत-दिग्दर्शक डॉ. आशीष मुजुमदार हे या कार्यक्रमाचे सादरकर्ते आहेत. अरुणाई आणि सप्तक यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम सायंकाळी ६.३० वाजता दक्षिण अंबाझरी रोडवरील अंध विद्यालयाच्या मुंडले सभागृहात होणार आहे. व्याख्यान आणि प्रात्यक्षिक यांचा सुरेख संगम असलेल्या या कार्यक्रमात डॉ. आशीष मुजुमदार गझलेविषयी अतिशय रंजक पद्धतीने विवेचन करतील. गझलेची रचना, तिचे बारकावे, शब्दांचे सौंदर्य, संगीत आणि गायकी याविषयीची माहिती रसिकांना सहज आणि मनोरंजक पद्धतीने अनुभवता येणार आहे. गझल केवळ ऐकण्यापुरती मर्यादित न राहता तिच्या अंतरंगाचा आस्वाद घेण्याची संधी या कार्यक्रमातून मिळणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून प्रवेश विनामूल्य आहे.

'वऱ्हाडी माय बोली' वऱ्हाडी कविता आणि विनोदी किश्यांची मैफल उत्साहात संपन्न!

बांधिलकी बहुउद्देशिय ट्रस्ट तसेच शारदा सखी मंडळ आयोजित हास्यकवी दिवाकर देशमुखांचे सादरीकरण, वऱ्हाडी बोलीचा गोडवा आणि हास्याच्या फुलोऱ्याने रसिक मंत्रमुग्ध



दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती : वऱ्हाडी बोलीभाषेचा गोडवा, ग्रामीण जीवनातील विनोद आणि मराठी साहित्याची समृद्ध परंपरा यांचा सुरेख संगम साधणारी 'वऱ्हाडी माय बोली' ही हास्य कविता व विनोदी किश्यांची मैफल अमरावती येथील नंदनवन कॉलनीत उत्साहपूर्ण वातावरणात दिनांक २३/१०/२६ रोजी संपन्न झाली. बांधिलकी बहुउद्देशीय ट्रस्ट, बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती आणि शारदा सखी मंडळ, नंदनवन कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख म्हणून नागपूर येथील प्रसिद्ध कवी तथा अक्षरक्रांती फाउंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे उपस्थित होते. अमरावतीचे ज्येष्ठ साहित्यिक आबासाहेब कडू यांचीही विशेष उपस्थिती लाभली. वऱ्हाडी हास्यकवी दिवाकर देशमुख यांनी आपल्या खास शैलीतून वऱ्हाडी भाषेतील विनोद, किस्से आणि हास्याची रंगतदार मेजवानी सादर केली.

वऱ्हाडी बोलीतील सहज संवाद, ग्रामीण जीवनातील गंमतीजमती आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या सादरीकरणामुळे मैफलीला विशेष रंगत आली. बोलीभाषेतील साहित्याचे सौंदर्य आणि त्यातून व्यक्त होणारे लोकजीवन यांचा अनुभव रसिकांना घेता आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नीता प्रफुल्ल कचवे यांनी केले, तर सूत्रसंचालन मा. रोशनी कडू यांनी केले. कार्यक्रमातून वऱ्हाडी बोलीभाषेच्या संवर्धनासह स्थानिक साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. वऱ्हाडी भाषेतील हास्यविनोद आणि साहित्यिक अभिव्यक्ती यांचा आनंद देणारी ही मैफल रसिकांसाठी संस्मरणीय ठरली. कार्यक्रमाच्या आयोजनातून मराठी बोलीभाषा, साहित्य आणि लोकसंस्कृती यांच्याप्रती आयोजकांची बांधिलकी अधोरेखित झाली.

दीनदयाल सेवा प्रतिष्ठान, यवतमाळ येथे एनजीओ सक्षमीकरण कार्यशाळा संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, यवतमाळ



ग्रामायण प्रतिष्ठान, नागपूर आणि दीनदयाल सेवा प्रतिष्ठान (दीनदयाल प्रबोधिनी), यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत दीनदयाल सेवा प्रतिष्ठान, माताेश्री वृद्धाश्रम जवळ, निळोणा तलावाच्या बाजूला, गोधनी, यवतमाळ येथे उत्साहात संपन्न झाले. या कार्यशाळेचा मुख्य विषय "एनजीओचे सक्षमीकरण हा होता.

या कार्यशाळेसाठी यवतमाळ जिल्ह्यातील विविध सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे वर्धा आणि वाशिम जिल्ह्यातूनही अनेक संस्थांचे पदाधिकारी या कार्यशाळेसाठी विशेष निमंत्रणावरून उपस्थित राहिले होते. एकूण सहा जिल्ह्यातील २२ संस्थांचे ४० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते. कार्यशाळेत खालील महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

१. एनजीओ नोंदणी प्रक्रिया, 12A, 80G, CSR-1, २. CSR फंड मिळविण्याची प्रक्रिया आणि कंपन्यांशी संपर्क कसा साधावा. ३. प्रभावी प्रकल्प अहवाल आणि वार्षिक अहवाल कसा तयार करावा. ४. हिशोब, ऑडिट आणि कागदपत्रांची पूर्तता. ग्रामायण प्रतिष्ठानतर्फे विजय खटी यांनी हे मार्गदर्शन केले. श्री खटी यांचा उरफ संबंधित विषयांचा अनेक वर्षांचा अनुभव आहे. वार्नंतर branding आणि सोशल मीडिया या विषयावर ग्रामायणचे अध्यक्ष अनिल सांबरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीनदयालजी आणि भारत मातेच्या फोटोला पुष्पार्चन करण्यात आले. यावेळी दीनदयाळ प्रतिष्ठानचे सचिव विजयराव कद्रे, अनिल सांबरे, डॉ. चंद्रकांत गारीट, संजय सराफ विशेषत्वाने उपस्थित होते. दीनदयाल प्रबोधनीचे CEO गजानन परसोडकर यांनी उपस्थित सर्व एनजीओचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे स्वागत केले. प्रारंभी दीनदयाल संस्थेचे कार्य दाखवणारी एक व्हिडिओ फिल्म सर्वांना दाखवण्यात आली. मंजुषा रागीट यांनी ग्रामायण प्रतिष्ठानची भूमिका स्पष्ट केली. उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी आपला व आपल्या संस्थेचा परिचय करून दिला.

गेल्या अनेक वर्षांपासून अनेक संस्था अतिशय चांगले सामाजिक कार्य करतात, मात्र कागदपत्रे, सीएसआर फंड आणि सरकारी योजनांच्या अभावी त्यांना अडचणी येतात. या अडचणींवर मात करून संस्थांना आत्मनिर्भर बनविणे हाच या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता, असे आयोजकांनी सांगितले. उपस्थित संस्थांनी आपले मनोगत व्यक्त केले. हा उपक्रम अतिशय उपयुक्त असल्याची भावना व्यक्त केली आणि भविष्यात अशाच कार्यशाळा आयोजित कराव्यात अशी मागणी केली.

महावितरणच्या अभियंत्यांनी जपली सामाजिक बांधिलकी!

राज्यातील ६ लाख १९ हजार विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षेचे धडे अन् हरित ऊर्जेचा जागर





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर एरवी राज्याला प्रकाशमय ठेवण्यासाठी रात्रंदिवस राबणाऱ्या महावितरणच्या अभियंत्यांनी यंदा संवेदनशीलतेने सामाजिक बांधिलकी जपत भावी पिढीच्या विद्युत सुरक्षेचा नवा अध्याय लिहिला. विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा आणि वीज बचतीबाबत जागीव निर्माण व्हावी, या उद्देशाने अभियंत्यांनी राज्यातील तब्बल २ हजार ९१४ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष जाऊन सुमारे ६ लाख १९ हजार विद्यार्थ्यांचे सादरीकरण व थेट संवादाद्वारे प्रबोधन केले. या विशेष उपक्रमादरम्यान शैक्षणिक संकुलांमध्ये विद्युत सुरक्षेचे पोस्टर्स, फ्लेक्स आणि माहितीपत्रकांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विद्युत यंत्रणेविषयी योग्य माहिती नसल्याने राज्यात लहान मुले आणि विद्यार्थ्यांचे विद्युत अपघात होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. यावर उपाय म्हणून महावितरणकडून यंदा अभियंता दिन व गणेशोत्सवाचे औचित्य साधून विद्युत सुरक्षा व हरित ऊर्जा प्रबोधन अभियान राबविण्यात आले. याअंतर्गत विद्युत सुरक्षेचे चित्रमय सादरीकरण, माहितीपत्रके आणि विविध प्रात्यक्षिके यासह विजेची निर्मिती व तिचा प्रवास कसा होतो यासह ऊर्जा बचत आणि 'विकसित भारत २०४७' या ध्येयासाठी भावी पिढीला हरित ऊर्जेचे महत्त्व समजून सांगण्यात आले.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि कार्यकारी संचालक परेश भागवत यांच्या पुढाकाराने या अभियानाचे आयोजन करण्यात आले. दि. १५ ते ३० सप्टेंबर या कालावधीत राज्यभरातील २ हजार ९१४ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे ६ लाख १९ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत महावितरणच्या अभियंत्यांनी अत्यंत सोप्या भाषेत, रंजक प्रसंगांतून आणि चित्रांच्या माध्यमातून 'विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा व ऊर्जा बचत' या विषयांवर प्रबोधन केले. या सादरीकरणानंतर बहुतांश शाळांमध्ये विजेचा प्रवास, विद्युत सुरक्षा आणि हरित ऊर्जेबाबत प्रश्नोत्तरांचे तास रंगले. तसेच अनेक शाळांमध्ये विद्युत सुरक्षेच्या विषयांवर चित्रांमध्ये रंग भरण्याची स्पर्धा घेण्यात आली.

या अभियानातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे, पुणे येथील 'द पुना स्कूल ऑफ होम फॉर द ब्लाईंड' या शाळेमध्ये अभियंत्यांनी विद्युत अपघाताबाबत अंध विद्यार्थ्यांना आवाज, स्पर्श आणि गंधाद्वारे संभाव्य विद्युत अपघाताचा धोका कसा ओळखावा याचे अत्यंत संवेदनशीलतेने प्रात्यक्षिक दिले. संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनीही जळगाव येथे विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

राज्यभरात राबवण्यात आलेल्या या अभियानात कोकण प्रादेशिक विभागात सर्वाधिक ९४६ शाळांमध्ये २ लाख १४ हजार विद्यार्थ्यांना, नागपूर प्रादेशिक विभागात ८९९ शाळांमध्ये १ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांना, पुणे प्रादेशिक विभागात ८२७ शाळांमध्ये १ लाख ६९ हजार विद्यार्थ्यांना आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात २४२ शाळांमध्ये ६५ हजार विद्यार्थ्यांना थेट संवादाच्या माध्यमातून विद्युत सुरक्षेचे व हरित ऊर्जेची माहिती दिली.

विद्युत सुरक्षा व बचत आणि हरित ऊर्जेची पेरणी करणाऱ्या महावितरणच्या या उपक्रमाचे राज्यभरातील शिक्षक, पालक आणि शिक्षण क्षेत्रातून जोरदार स्वागत करण्यात आले. महावितरणमधील अभियंत्यांच्या या सामाजिक संवेदनशीलतेमुळे राज्यात शून्य विद्युत अपघाताच्या दिशेने व विद्युत सुरक्षेच्या जागराचे एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

थोडक्यात

नागपूर विभागीय मैदानी स्पर्धेत देवांग हिरूडकरची सुवर्णभरारी!

तीन सुवर्णपदकांची कमाई, राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभागीय शालेय मैदानी स्पर्धा २०२६ मध्ये श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, नागपूर येथील इयत्ता ८ वी 'अ' चा विद्यार्थी देवांग हिरूडकर याने उत्कृष्ट कामगिरी करत तीन सुवर्णपदकांवर आपले नाव कोरले. चंद्रपूर येथे आयोजित या स्पर्धेत देवांगने १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे आणि लांब उडी या तीनही क्रीडा प्रकारांत सुवर्णपदक प्राप्त करून शाळेचा नावलौकिक वाढविला. देवांगच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे नोव्हेंबर महिन्यात रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. देवांगच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रविंद्र फडणवीस, सीमा फडणवीस, प्रशिक्षक अशपक शेख आणि शाळेच्या मुख्याध्यापिका माया बमनेटे व पालकांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले.



युवा उद्योजक सुयश सिंहने उदयोन्मुख संशोधकांशी साधला संवाद

प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्स्प्लोरेटरीला सदिच्छा भेट

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गॅलेक्सीआयचे संस्थापक आणि भारतातील पहिल्या खासगी उपग्रहाला अवकाशात प्रक्षेपित करणारे दूरद्रष्टे युवा उद्योजक सुयश सिंहने प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्स्प्लोरेटरी (पीआरएसएसई) च्या उद्योन्मुख संशोधकांशी संवाद साधत नागपूरमधूनही भविष्यात प्रतिभावान अंतराळ संशोधक आणि उद्योजक घडावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्स्प्लोरेटरी (पीआरएसएसई) ला मूळ नागपूरचे असलेले सुयश सिंह यांनी रविवारी सदिच्छा भेट दिली. यावेळी झालेल्या संवादात्मक कार्यक्रमाला २०० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.



सुयश सिंह यांनी हायपरलूप विकसित करण्यापासून ते १३० उपग्रह प्रक्षेपित करण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टापर्यंतचा त्यांचा प्रवास उलगडला. यश मिळवायचे असेल तर विषयाचा पाया मजबूत करणे, सातत्य राखणे आणि स्वतःची खरी आवड व क्षमता यांच्याशी सुसंगत करिअर निवडणे अत्यंत आवश्यक असल्याचे ते म्हणाले. आयुष्य कधीही सोपे नसते; मात्र नवीन आव्हानांना सामोरे जाताना ते अधिक आनंददायी बनते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना सतत शिकत राहण्याचा आणि चिकाटीने प्रयत्न करण्याचा संदेश दिला. शाळांमधील विद्यार्थ्यांना वार्षिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याच्या पीआरएसएसईच्या उपक्रमाचे सिंह यांनी कौतुक केले. यावेळी पीआरएसएसईच्या संचालिका डॉ. सीमा उबाळे, अध्यक्ष हेमंत चाफले आणि सल्लागार विनय सालोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंतप्रधान मोदींच्या वडिलांवर खालच्या पातळीची टीका, खरगेंचा महादुला-कोराडीत संताप, भारत माता चौकात जाहीर निषेध



दे. सिंहवाणी वृत्त, महादुला (कोराडी)

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आज संरक्षण, मिसाईल तंत्रज्ञान आणि जवानांच्या सन्मानात जगात नंबर १ होत असताना, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधानांच्या स्वर्गीय वडिलांबद्दल केलेल्या अत्यंत खालच्या पातळीच्या आणि आक्षेपार्ह टिप्पणीचा महादुला-कोराडी परिसरात तीव्र उद्रेक झाला. काँग्रेसची वैचारिक दिवाळखोरी संपली असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत आज दुपारी ४.३० वाजता भारत माता चौक, महादुला येथे भाजपाच्यावतीने जोरदार घोषणाबाजी आणि जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले. "खरगे माफी मांगो" आणि "भारत माता की जय" च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

या आंदोलनात नेतृत्व महादुला शहर अध्यक्ष सचिन पाटील, भाजपा अध्यक्ष, कोराडी लोकेश वऱ्होकर, सामाजिक कार्यकर्ते मनोज सावजी (ठाकुर) मां, सरपंच नरेंद्र धनुले, मनीष मेश्राम बंडू कापसे, जेष्ठ नेते रामबाबू तोडवाल,भाजप गटनेते अभिजित ढेंगरे, सामाजिक कार्यकर्ते विजय जैन, नगरसेवक मोहसीन शेख, बाबुराव सोनवणे, सोमनाथ चपडिया, अंकित तुरक, नगरसेविका स्वाती पटले, भाजपा महिला आघाडी अध्यक्षा ट्विंकल, पाखिड्डे, वर्षा अंजनकर, आरती पोफळघत, सामाजिक कार्यकर्ते नाना लांडे, मनोज पवार, शुभम आवरकर,यांनी केले यासह मोठ्याप्रमाणात भाजप कार्यकर्ता महिला आघाडी अध्यक्षा ट्विंकल पखिड्डे, आणि त्यांचे आघाडीतील महिला उपस्थित होत्या, खरगे होश मे आओ, भारत माता की जय अशा घोषणांनी परिसर निनादला.

कामांना मंजुरी न घेताच वर्क ऑर्डर दिल्या

लातूर : लातूर जिल्हा परिषदेत मागच्या ४ ते ५ वर्षात ज्या पध्दतीने कामांना मंजूरीच्या पूर्वी वर्क ऑर्डर दिली जात होती. आगदी त्याच पध्दतीने सध्या कामे सुरू आहेत. अशा कारभारला आळा घालने तर सोडच जि. प. अधिकाऱ्यांनाच पदाधिकारी पाठीशी घालत आहेत. हा कामाचा चुकीचा पायंडा पडत आहे. हे ७ पैकी एकाच कामाला रितसर मंजरी दिली, तर इतर कामांना मंजूरी नंतर घेतली जात आहे, हे यावरून सिध्द होत असल्याचा आरोप जि. प. काँग्रेसच्या गट नेत्या अशाताई भिसे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून दर्जेदार व नियमानुसार कामे होणे अपेक्षित आहेत, असेही त्या म्हणाल्या.

पाणी टंचाई निवारण उपाययोजना, पाच नगरपंचायतींचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

टंचाई निवारणासाठी आठ महिन्यांचे नियोजन, बंद बोअरवेलसह विहिरींच्या दुरुस्तीवर भर

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर



अल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद नगरपरिषद, नगरपंचायतींना स्वतंत्र आढावा घेत आहे. आज जिल्हाधिकाऱ्यांनी पाच नगरपंचायतींचा आढावा घेतला. पुढील आठ महिन्यांसाठी पाणीपुरवठ्याचे नियोजन करून तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी नगरपंचायतींना दिले.

जिल्ह्यातील नगर परिषद व पंचायत क्षेत्रांमध्ये पाणीटंचाई उद्भवू नये, यासाठी पर्यायी पाणी स्रोत उपलब्ध करणे, बंद बोअरवेल सुरू करणे, विहिरींची दुरुस्ती, पाइपलाईन गळती रोखणे आणि नवीन पाणीपुरवठा योजनांची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हा नियोजन भवन येथे पाणीटंचाई निवारणासाठी आयोजित बैठकीत येरखेडा, भिवापूर, मौदा, महादुला आणि रामटेक नगर परिषद व पंचायतींच्या पाणीटंचाई निवारण उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी संभाव्य पाणीटंचाईचा आराखडा तयार करून आवश्यक कामांचे प्राधान्यक्रम निश्चित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

पाइपलाइन गळती रोखून पाणीपुरवठा सुरळीत करा

येरखेडा, महादुला आणि मौदा या क्षेत्रांतील पाणीपुरवठ्यांशी संबंधित समस्यांवर उपाययोजना करण्याच्या सूचना देऊन पाइपलाइनमधील गळती तातडीने दुरुस्त करणे, बंद पडलेल्या पाणीपुरवठा यंत्रणेची दुरुस्ती करणे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी स्रोतांचा वापर करण्यावर भर देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

एक दिवसाआड होणारा पाणीपुरवठा नियमित करण्यासाठी नगर परिषद कामठीच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच १७ बोअरवेल आणि चार विहिरींच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करणे, आवश्यकतेनुसार खासगी विहिरी अधिग्रहित करणे आणि नदीवर तात्पुरता बंधारा बांधण्यासाठी कार्यवाही करण्यास त्यांनी सांगितले.

सौरऊर्जेवरील लघु पाणीपुरवठा योजनांना प्राधान्य

पाणीटंचाईग्रस्त प्रभागांमध्ये सौरऊर्जेवर आधारित लघु पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जलशुद्धीकरण केंद्रांच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करणे, पाणी वितरण व्यवस्था नसलेल्या भागांत तातडीने वितरण व्यवस्था उभारणे आणि विहिरींच्या दुरुस्तीची कामे प्रस्तावित करण्यावर भर देण्यात आला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या कामांमधील त्रुटींची पूर्तता करून ही कामे मार्गी लावण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

त्या कंत्राटदारांवर आपत्ती व्यवस्थापनांतर्गत नोटीस

नवीन पाणीपुरवठा योजनांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यावर भर देऊन नगरपंचायतींनी नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल, याची खात्री करावी. कामात विलंब करणाऱ्या कंत्राटदारांना आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत काम पूर्ण करण्याबाबत नोटीस देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले. पाणीपुरवठा योजनांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी तातडीने कार्यदिश जारी करण्यास त्यांनी सांगितले.

रामटेकमध्ये ३२ विहिरींच्या दुरुस्तीचे नियोजन

रामटेक नगर परिषदेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या ३२ विहिरींच्या दुरुस्तीची माहिती आवश्यकतेनुसार नियोजनबद्ध पद्धतीने हाती घ्यावे. जिल्हा वार्षिक योजना आणि जिल्हा खनिज क्षेत्र विकास निधीतून प्रस्तावित करावयाची कामे प्राधान्यक्रमानुसार तीन टप्प्यांत सादर करण्याचे निर्देश दिले. संभाव्य पाणीटंचाईचा आराखडा तयार करून आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करावे. प्रभाग क्रमांक २ आणि १० मधील नवीन पाणी वितरण व्यवस्थेच्या दरांना मंजुरी मिळाल्यानंतर तातडीने कार्यादेश देऊन ३० नोव्हेंबरपर्यंत कामे पूर्ण होतील, याची दक्षता घ्यावी, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

टिल्लू पंपांवर जप्तीची कारवाई

रामटेक नगर परिषद क्षेत्रातील बंद असलेले २० बोअरवेल तातडीने सुरू करण्याची कार्यवाही करावी. पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या टिल्लू पंपांवर जप्तीची कार्यवाही करावी. भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन आवश्यकता भासल्यास दोन नवीन पाण्याच्या टाक्यांची कामे प्रस्तावित करावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

आतापर्यंत १६ नगरपरिषद, पंचायतीचा आढावा

पाणी टंचाई सदृष्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी आतापर्यंत २९ नगर परिषद व पंचायतीपैकी १६ नगर परिषद व पंचायतराज आढावा घेतला. १३ पंचायत, परिषदेचा आढावा येत्या २८ व २९ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे.

खापरखेडा येथे शाहिरांचा महासंग्राम उत्साहात

खडी गंमत आणि शाहिरीतून समाजप्रबोधनाचा जागर, कोशिश फाउंडेशन व शेतकरी सेलिब्रेशनचा स्तुत्य उपक्रम, शेकडो रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दे. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

आधुनिक मनोरंजनाच्या झगमगाटात लोप पावत चाललेल्या पारंपरिक लोककलांचे जतन व्हावे आणि शाहिरीच्या माध्यमातून ज्वलंत सामाजिक प्रश्नांवर प्रकाश पडावा, या उद्देशाने कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून खापरखेडा येथे आयोजित शाहिरांचा महासंग्राम खडी गंमत कार्यक्रम प्रचंड उत्साहात व समाजप्रबोधनपर वातावरणात संपन्न झाला वॉर्ड क्रमांक १ मधील पंचशील भवन परिसरात रंगलेल्या या लोककलोत्सवाला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती.

कार्यक्रमाचे आयोजन कोशिश फाउंडेशन व शेतकरी सेलिब्रेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते कोशिश फाउंडेशनचे संयोजक कपिल वानखेडे व भीमरावजी तागडे यांनी या आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक उपक्रमासाठी विशेष पुढाकार घेतला.

शाहिरीच्या खणखणीत आवाजात समाजप्रबोधन



महाराष्ट्राच्या मातीला शाहिरी परंपरेचा मोठा वारसा आहे ही कला केवळ मनोरंजनाचे साधन नसून अनिष्ट रूढी-परंपरांवर प्रहार करणारे प्रभावी माध्यम आहे याची प्रचिती या महासंग्रामात आली शाहीर सुरमा बारसागडे आणि शाहीर सूरज नवघरे यांच्यात रंगलेल्या शाहिरी जुगलबंदीने उपस्थितांची मने जिंकली.

दोन्ही शाहिरांनी आपल्या डफ आणि खंजिरीच्या तालावर व्यसनमुक्ती, शिक्षण, स्त्री-भ्रूणहत्या बंदी, सामाजिक ऐक्य आणि शेतकऱ्यांचे वास्तव यांसारख्या विविध विषयांवर प्रबोधनपर गीते व पोवाडे सादर केले डफातून उमटणाऱ्या प्रत्येक थापेवर उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत दाद दिली.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक कपिल वानखेडे व भीमरावजी तागडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की आजची युवा पिढी डिजिटल माध्यमांमध्ये व्यस्त असताना आपल्या पारंपरिक लोककला आणि त्यातील प्रबोधनाचे मूल्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे काळाची गरज आहे.

खापरखेडा परिसरातील नागरिकांना मनोरंजना सोबतच वैचारिक दिशा मिळावी हाच या आयोजना मागचा मूळ हेतू होता असे सांगितले. याप्रसंगी प्रेक्षकांसाठी लकी ड्रॉचे आयोजन करून विजेत्यांना विविध आकर्षक बक्षिसांचे वाटप करण्यात आले सामाजिक बांधीलकी जपत स्थानिक पातळीवर लोककलेला हक्काचे व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल संपूर्ण परिसरात आयोजकांचे कौतुक होत आहे.

या प्रबोधनपर महोत्सवाला परिसरातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर अरविंद चिखले, राहुल तिवारी, प्रकाश खापरे, मिनाक्षी तागडे, मधुकर दुगाने, अमर जैन, केवल मेंढे, सुनील जालंदर, अशोक वंजाळ, नाना केने, सुधाकर तिबोले, किशोर बक्सरिया, मनोज माटे, रिंकू सिंग, प्रशांत सरोदे, कुणाल वाडेकर, सिद्धार्थ मानेराव, जितेंद्र तागडे, वामन भडंग, किरण तागडे, रंजित तागडे, सदानंद नारनवरे, दीपक धनविजय, दिनेश कडू, अंकित तागडे, अभिषेक सोमकुवर, यश ठाकरे, शुभम तरारे, सुनिल डिगे, सौरभ रंगारी, दिलीप मंडपे, मंगेश वरभे, लोकेशन गायकवाड यांनी हजेरी लावली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिसरातील कार्यकर्त्यांनी व रसिकांनी परिश्रम घेतले. सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाने खापरखेडयाच्या सांस्कृतिक चळवळीत नवा आदर्श निर्माण केला आहे.

किल्ले कोल्हार वळण ठरतेय अपघातांचा सापळा! रवींद्र वालोकर यांच्या मृत्यूनंतर सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

दे. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

नागपूर-मध्य प्रदेश महामार्गावरील देहगावजवळ असलेला किल्ले कोल्हार वळणावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. नुकत्याच झालेल्या अपघातात खापरखेडा येथील रवींद्र मनोहर वालोकर यांचा मृत्यू झाल्याने या वळणावरील सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. अपघातांची मालिका थांबविण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर पंचायत समिती, सावनेरचे उपसभापती राहुल तिवारी यांनी खापरखेडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदीप बुवा यांना निवेदन देऊन किल्ले कोल्हार वळणावरील अपघातांचा प्रश्न गांभीयनि हाताळण्याची मागणी केली.



किल्ले कोल्हार वळणावर वारंवार अपघात होत असल्याने शहर पोलीस, वाहतूक पोलीस, महामार्ग पोलीस आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) अधिकाऱ्यांनी घटनास्थळची संयुक्त पाहणी करावी.

अपघातांची कारणे शोधून कायमस्वरूपी उपाययोजना आखाव्यात,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या वळणावर वाहनचालकांना मागार्चा अंदाज येण्यासाठी दिशादर्शक फलक लावणे, आवश्यक ठिकाणी अडथळे उभारणे आणि इतर सुरक्षात्मक उपाय तातडीने करणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे, अपघातांचा धोका लक्षात घेता आवश्यकतेनुसार हा मार्ग बंद करण्याचा किंवा पर्यायी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्याचाही विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. रवींद्र वालोकर यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन वाहनचालक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलावीत,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महिंद्रा अँड महिंद्राच्या बुटीबोरी प्रकल्पासाठी ८०० एकर जमिनीचा ताबा

'अॅडव्हांटेज विदर्भ २०२६' नंतर सहा महिन्यात हस्तांतरण, एआयडीची महत्त्वपूर्ण भूमिका

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडच्या अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ८०० एकर जमिनीचा ताबा सोमवारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या(एमआयडीसी) वतीने कंपनीला देण्यात आला. 'अॅडव्हांटेज विदर्भ २०२६' मध्ये या प्रकल्पासाठी झालेल्या सामंजस्य करारानंतर अवघ्या सहा महिन्यांच्या आत जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली. या प्रकल्पाच्या प्रक्रियेत असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी)ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी मनोहर पोटे आणि मुख्य अभियंता राजेश झंजाळ यांच्या हस्ते जमिनीचा ताबा देण्यात आला. महिंद्रा अँड महिंद्राच्या वतीने ऑटो विभागाचे चीफ ऑपरेटिंग अधिकारी डॉ. विनय खानोलकर, नागपूर ग्रीनफिल्ड प्रकल्पाचे प्लांट हेड नितीन वैद्य आणि आशिष सोडते यांनी ताबा स्वीकारला. यावेळी एआयडीचे सीईओ डॉ. कपिल चांद्रायण उपस्थित होते. या प्रकल्पात महिंद्रा अँड महिंद्रा १५ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करणार असून, २० हजारांपेक्षा अधिक प्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. कंपनीला एकूण १,५०० एकर जमीन देण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी ८०० एकर जमिनीचा ताबा देण्यात आला असून, उर्वरित ७०० एकर जमिनीचा ताबा लवकरच देण्यात येणार आहे.



डावीकडून नितीन वैद्य, डॉ. विनय खानोलकर, श्री राजेश जी झंजाळ, श्री मनोहर पोटे व डॉ कपिल चांद्रायण

या प्रकल्पातून कंपनी दरवर्षी सात लाखांहून अधिक व्यावसायिक वाहने बाजारात आणणार आहे. पहिल्या टप्प्यातील ८०० एकर जमिनीसाठी कंपनीने एमआयडीसीकडे ७०६ कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा केली आहे. 'अॅडव्हांटेज विदर्भ २०२६' मधील सामंजस्य करारानंतर सहा महिन्यांच्या आत जमीन हस्तांतरण झाल्याने विदर्भात उद्योगांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या एआयडीच्या प्रयत्नांना महत्त्वपूर्ण यश मिळाले असल्याचे डॉ. कपिल चांद्रायण म्हणाले.

थोडक्यात

जवाहरलाल नेहरू सावनेरचा सॉफ्टबॉल संघ राज्यस्तरावर



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

क्रीडा व युवक कल्याण सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय गडचिरोली यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत जवाहरलाल नेहरू चा संघ राज्यस्तरीय स्पर्धेकरिता पात्र ठरला. गोंडवाना सैनिक स्कूल गडचिरोलीच्या प्रांगणात १४ वर्षे मुले या वयोगटात विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा घेण्यात आल्या त्यात जवाहरलाल नेहरू सावनेरने नूतन भारत विद्यालय नागपूरचा १२-०२ ने पराभव करीत स्पर्धेत अजिंक्य ठरला. या संघात दर्श मुरमारे(कर्णधार), प्रतीक सांबारे,कृणाल धोटे, कृष्णा मोहोतकर,भावेश चिखले, हिरक दातारकर,विक्रांत मुरो डिया,तेजस ठाकरे, हेमंत मिलमिले, शौर्य ठाकूर, हर्षित देशमुख,कार्तिक घटे,पियुष ढोबळे,स्वरूप कनेरे, कुणाल बानाईत,सुशांत बेलेकर, या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत आपल्या संघास अजिंक्यपद केले व राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धे करता आपले स्थान पक्के केले.

शाळेच्यावतीने मुख्याध्यापिका कमल बुव्हान, पर्यवेक्षिका केदार मॅडम यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व्हीएसपीएम एकेडमी ऑफ हायर एज्युकेशन नागपूर,संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मा.रणजीत बाबू देशमुख आमदार मा.डॉ.आशिषबाबू देशमुख पालक संचालक चंद्रशेखरजी बरेठिया, अरविंद लोधी (माजी नगराध्यक्ष न.प सावनेर), दुबे सर, सचिन उईके शाळा समिती सदस्य यांनी राज्यस्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील तसेच शाळेचे वरिष्ठ सॉफ्टबॉल खेळाडू चैतन्य बरमकर, प्रणय घुगल, भावेष बोंडे यांना दिले शाळेतील सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

जयंतीनिमित्त महर्षी वाल्मिकी यांना 'महावितरण'चे अभिवादन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रामायण या महाकाव्याचे रचनाकार, आद्यकवी तसेच संस्कृत, ज्योतिष आणि खगोलशास्त्राचे प्रकांड पंडित महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. काटोल रोड येथील महावितरणच्या नागपूर परिमंडल मुख्यालयात (विद्युत भवन) आयोजित संक्षिप्त कार्यक्रमात अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी कार्यकारी अभियंता अमित शिवलकर, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटणकर यांच्यासह परिमंडलातील इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनपातर्फे महर्षी वाल्मिकी यांना आदरांजली



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रामायणाचे रचियता महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्ताने नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील महापौर कक्षासमोरील तैलचित्राला उपमहापौर श्रीमती लिला हाथीबेड यांनी आज (ता. २६) पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी उपायुक्त श्री. राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, अमोल तपासे, प्रमोद बराई यांनी पुष्पांजली अर्पण केली. यावेळी अ. भा. वाल्मिकी महासभाचे सर्वश्री मोतीलालजी जनवारे, उमेश पिंपरे, राजेंद्र हजारे, बंटी पैसाडली, राजकुमार खरे, रमेश मोगरे, शंभूलाल समुद्रे, विशाल मधुमटके, संदीप नाहरकर, निलेश सागर, बबलू मेहरोलिया व अनिल कटारे यांनीही उपस्थित राहून आदरांजली वाहिली.

सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ३२८ प्रकरणांची नोंद, उपद्रव शोध पथकाची कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. (ता. १८ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर) शोध पथकाने ३२८ प्रकरणांची नोंद करून १,६१,१०० रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी/ उघडयावर मलमुत्र विर्सजित करणे या अंतर्गत १३ प्रकरणाची नोंद करून ६५०० रूपयाची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत १८७ प्रकरणांची नोंद करून ७४,८०० रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १० प्रकरणाची नोंद करून १००० रूपयाची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ३५ प्रकरणाची नोंद करून १४००० रूपयाची वसुली करण्यात आली.

राज्यातील नवीन ऊर्जा प्रकल्पांना मोठा दिलासा

जमिनीच्या अंतर्गत हस्तांतरणातील २५ टक्के शुल्क माफ, चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

सौर किंवा पवन ऊर्जेसारख्या नवीन ऊर्जा प्रकल्पांसाठी खरेदी करण्यात आलेल्या जमिनीच्या अंतर्गत हस्तांतरणावरील २५ टक्के हस्तांतरण शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्य कंपनीकडून विशिष्ट प्रकल्पाच्या उप-कंपनीकडे जमीन हस्तांतरित करताना आकारले जाणारे हे शुल्क माफ झाल्यामुळे कंपन्यांवरील अतिरिक्त आर्थिक भार टळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरुन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला.

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन कायद्यांतर्गत



औद्योगिक वापरासाठी खरेदी केलेली जमीन हस्तांतरित करताना रेडी रेकनरच्या दरानुसार बाजारमूल्याच्या २५ टक्के हस्तांतरण शुल्क जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करण्याची तरतूद होती. नवीन ऊर्जा क्षेत्रात मोठा प्रकल्प उभारताना मुख्य कंपनीला बँक कर्ज मिळवण्यासाठी किंवा परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी जमीन स्वतंत्र उप-कंपनीकडे वर्ग करावी लागते. कंपनीची मालकी तीच राहत असली आणि हा केवळ अंतर्गत व कागदोपत्री बदल असला, तरी या हस्तांतरणावर २५ टक्के शुल्क आकारल्या जात असल्याने प्रकल्प खर्चात मोठी वाढ होत होती. यामुळे ऊर्जा निर्मितीच्या कामात विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे १८ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयाला अनुसरुन हा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, ही सवलत देताना शासनाने एक अट घातली असून, जुन्यासार जमिनीचा अंतिम वापर केवळ नवीन ऊर्जा विकासासाठीच करणे बंधनकारक राहील. जर एखाद्या कंपनीने शुल्कमाफीचा लाभ मिळवून ती जमीन नंतर निवासी, व्यावसायिक किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वापरली अथवा अन्य त्रयस्त पक्षाला विकली, तर ही सूट तात्काळ रद्द केली जाईल आणि हस्तांतरण शुल्काची संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल केली जाईल. शासनाच्या या दूरगामी निर्णयामुळे राज्यातील नवीन ऊर्जा क्षेत्राच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे.

या निर्णयामुळे कंपन्यांवरील अतिरिक्त आर्थिक भार टळेल, प्रकल्प खर्चात बचत होईल आणि महाराष्ट्रात हरित ऊर्जा क्षेत्रातील मोठ्या गुंतवणुकीला अधिक प्रोत्साहन मिळेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

नांदेडमधील शेतकरी आत्महत्या चीड आणणारी : गृहराज्यमंत्री पंकज भोयर



मुंबई : नदिडमधील शेतकऱ्यांची आत्महत्या ही चीड येणारी आहे, त्यामुळे निश्चितच दुष्काळ आणि अडचणीच्या काळात शेतकऱ्यांकडून अव्वाच्या सव्वा व्याजदर आकारत जर वसुली करण्यात येत असेल तर त्यांच्याचर कारवाई करण्यात येईल, असे पंकज भोयर यांनी म्हटले आहे. पंकज भोयर म्हणाले की, राज्यात अर्थखाते कोणाला द्यायचे याचा निर्णय देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, आणि सुनेत्रा पवार हे एकत्र बसून योग्य तसे निर्णय घेतील.

गृह राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, नदिडमध्ये घडलेली दुर्घटना अतिशय दुदैवी आहे. मुदखेड तालुक्यातील एका शेतकऱ्याकडे सारखा वसुलीचा तडाखा लावल्यामुळे त्या शेतकऱ्याने कार्यालयात जात आत्महत्या केली. ही आत्महत्या आहे की हत्या याबद्दल तपास सुरू आहे. अवैध वसुली, अव्वाच्या सव्वा व्याज आकारणी करत शेतक-यांची जर लूट केली जात असेल तर मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांवर कठोर कारवाई केली जाईल.

कंपनी गुजरातची असली तरी सोलार इथे वापरणार

कर्जतच्या वृक्षतोडीवर बोलताना पंकज भोयर म्हणाले की, कंपनी जरी गुजरातमधील असली तरी सुद्धा तिथे तयार होणारी वीज हे महाराष्ट्राला वापरण्यात येणार आहे. एकंदरीत किती झाडे तोडण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राला किती विज मिळणार आहे, महाराष्ट्रातील किती लोकांना याचा फायदा होणार आहे हे समजून घेत उद्योजकांनी बोलले पाहिजे.

राज्य हिरवे गार करणार

पंकज भोयर म्हणाले की, सुधीर मुनगंटीवार वनमंत्री असताना मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचर मोहिम आपण राबवली होती. आता सुद्धा त्या प्रमाणेच आता राज्य हिरवेगार करण्याचा निर्णय सरकारने केला आहे.

मायक्रो फायनान्सविरोधात 'हंटर मारो' आंदोलन करणार

अमरावती : मायक्रो फायनान्स कंपनीने जर शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने वसुली केली तर त्यांच्याविरोधात आम्ही हंटर मारो आंदोलन करणार आहोत. शेतकऱ्यांकडून कुठेही सक्तीची वसुली केली जात असेल तर हंटर मारा आणि त्या घटनेची आम्हालाही माहिती द्या. आम्ही त्याला रस्त्यावर चोपल्याशिवाय राहणार नाही. सरकारने पत्रिपत्रक काढून सुद्धा अवैध सावकार आणि छोट्या फायनान्स कंपन्या मानत नाही. या सर्वांनी वसुलीसाठी गुंड पोसले आहेत. सरकारने जी ५ हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांना जाहीर केली आहे त्यामध्ये वाढ झाली पाहिजे आणि ३० तारखेपूर्वी ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली तर बरे होईल, असे शिवसेना नेते बच्चू कडू यांनी म्हटले आहे. बच्चू कडू म्हणाले की, महायुतीमध्ये भाजप आणि शिवसेनेत काहीही तणाव नाही. मंत्रिमंडळ विस्तार दुष्काळामुळे होईल का नाही सांगता येत नाही. पण ठरल्याप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसकडे अर्थखाते होते ते त्यांना दिले पाहिजे. खरगे यांच्यासारखा नेता जर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना पाहिली सोडत असेल तर योग्य नाही.



शहरातील १६१ कार वॉशिंग सेंटरची मनपाकडून तपासणी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन मनपा प्रशासनाने पाण्याचा दुरुपयोग करणाऱ्याविरुद्ध धडक कारवाई सुरू केली असून, शहरातील दहाही झोनमधील १६१ कार वॉशिंग सेंटरची तपासणी करण्यात आली आहे. यात कार व इतर वाहने धुण्यासाठी विहिरीचे पाणी, कूपनलिका(बोरवेल) व तसेच मनपातर्फे पुरविण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मनपाच्या उपद्रव शोध पथक व ओसीडब्ल्यूच्या पथकाद्वारे संयुक्तपणे पाहणी केली जात आहे.

महापौर निता ठाकरे आणि मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी काही दिवसांपूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन उपाययोजना करण्याचे सुचविले होते. यात कार वॉशिंग सेंटर व जलतरण तलावांमध्ये होत असलेल्या पाणी पुरवठ्याची तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. यानुसार शहरातील १० झोनमध्ये उपद्रव शोध पथकाने धडक कारवाई केली. बहुतेक कार वॉशिंग सेंटरमध्ये विहीर किंवा बोअरवेलच्या पाण्याचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले. काही कार वॉशिंग सेंटरचे मालक पिण्याच्या पाण्याचा वापर वासाठी करीत असल्याचे दिसून आले आहे. लक्ष्मीनगर झोनमधील १२ कार वॉशिंग सेंटरची तपासणी करण्यात आली, यात ७ ठिकाणी विहीर व ५ ठिकाणी बोअरवेलच्या पाण्याचा वापर होत असल्याचे दिसून आले. धरमपेठ झोनमध्ये एकूण २६ कार वॉशिंग सेंटरची पाहणी करण्यात आली. यात चार वॉशिंग सेंटरचे मालकी बेकायदेशीरपणे नळाद्वारे येणाऱ्या पाण्याचा वापर वाहने धुण्यासाठी करीत असल्याचे निदर्शनास आले. हनुमाननगर झोनमध्ये १७ ठिकाणी विहिरीच्या पाण्याचा वापर होत असल्याचे तसेच उर्वरित ठिकाणी बोअरवेलच्या पाण्याचा वापर वाहने धुण्यासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

अड्याळ येथे हजारो दमा रुग्णांनी घेतला औषधोपचाराचा लाभ



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

पवनी तालुक्यातील अड्याळ येथील जागृत श्री हनुमंत देवस्थानात कोजागिरी पौर्णिमा अर्थात शरद पौर्णिमेच्या पावन पर्वावर दमा रुग्णांसाठी विनामूल्य औषध वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी भंडारा जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातून हजारो दमा रुग्णांनी अड्याळ येथे गर्दी केली होती.

अड्याळ येथील जागृत हनुमंत मंदिरात गेल्या २० ते २५ वर्षांपासून दरवर्षी शरद पौर्णिमेच्या निमित्ताने विनामूल्य दमावरील औषधाचे वितरण केले जाते. या परंपरेमुळे दरवर्षी औषध घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळते. यंदाही जिल्ह्यातील तसेच परजिल्ह्यांतील रुग्णांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

देशी गायीचे दूध आणि तांदळाच्या खिरीतून औषध वितरण

अड्याळ येथील अशोक सलुजा यांनी चित्रकूट येथून आणलेल्या आयुर्वेदिक औषधीचे वितरण या कार्यक्रमात करण्यात आले. देशी गायीचे दूध आणि तांदळाची खीर मातीच्या भांड्यात, चुलीवर रानातील गोवऱ्यांचा इंधन म्हणून वापर करून शिजविली जाते. त्यानंतर या खिरीमध्ये औषधी मिसळून रुग्णांना दिली जाते, अशी या उपक्रमाची परंपरा आहे.

या औषधीचा लाभ घेतल्यानंतर अनेक रुग्णांनी समाधान व्यक्त केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे दरवर्षी या औषधासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. औषध वितरणानंतर रुग्णांना पथ्यपालनाबाबत आवश्यक माहितीही देण्यात आली.

देवस्थान समिती व ग्रामस्थांचा सहभाग

या कार्यक्रमाला श्री हनुमान देवस्थान व महादेव देवस्थान समितीचे पदाधिकारी, गावातील प्रतिष्ठित मान्यवर, विविध मंडळांचे सदस्य तसेच भजन मंडळातील युवा सदस्य उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम पार पडला.

शरद पौर्णिमेच्या निमित्ताने अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा अड्याळ परिसरात विशेष महत्त्वाची मानली जाते. दरवर्षी विदर्भातील विविध भागांतून रुग्ण या ठिकाणी येत असल्याने या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

शरद पौर्णिमेनिमित्त जागृत हनुमंत देवस्थानात विनामूल्य औषध वितरण

मनुष्याला आत्मसन्मानाने जगण्याचा हक्क आहे आणि तो त्याला मिळावा यासाठी देशात आमच्या असोसिएशनची सातत्यपुर्ण जनजागृती

भारतीय मानवाधिकार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अनुराग चंद्रवंशी यांचे प्रतिपादन

दै. सिंहवाणी वृत्त, ठाणे-गुरुनाथ तिरपणकर

उपरोक्त संस्थेच्या महाराष्ट्र राज्याशाखेची विशेष सभा ठाणे येथे पार पाडली. याठिकाणी दिल्लीवरून आलेले संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष, मान्यवर अतिथी, पदाधिकारी व बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अनुराग चंद्रवंशी अध्यक्षपदावरून बोलताना पुढे म्हणाले, आमची संघटना देशात जवळपास सतरा राज्यात ७५ हजारपेक्षा जास्त स्वयंसेवकासह कार्यरत आहोत. आणि विविध उपक्रमाद्वारे आम्ही मानवकल्याणासाठी सातत्यपुर्ण प्रगतीशील आहोत.

संपुर्ण मानवाधिकार हा



जागतीक संयुक्त राष्ट्रसंघाने ही मान्य केला आहे. आपल्या भारतीय राज्यघटनेत Right to live with Dignity असा याचा उल्लेख आहे. याकरीता आमची एनजीओ सरकारसोबत काम करत असताना जेथे जेथे अन्याय अत्याचार घडत असतात. तेथे तेथे आम्ही सामंजस्याने, प्रसंगी कायद्याने सलोखा आणण्याचे काम करतो. सुरक्षा का द्वार यही मानवाधिकार या ब्रीद वाक्याने आमचे कार्यकर्ते समाज देश विकासासाठी सतत प्रयत्नशील असतात.

ते पुढे म्हणाले जगातील सर्वोत्तम भारतीय कुटुंबव्यवस्थेला दुर्दैवाने आज ग्रहण लागले आहे. याला कारण पती पत्नी मधील वाढता बेबनाव व नातेसंबधातला तणाव. याला आमचा मॅचमाईड हा पर्याय उपाय ठरू शकतो. आमच्या संस्थेचा हा सर्वोत्तम उपक्रमाचे महत्व राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकारने ही मान्य केले आहे. याद्वारे आम्ही काही राज्यात विवाहपुर्व समुपदेशन केंद्र उघडली आहे. लवकरच असे केंद्र महाराष्ट्रात ही उघडले जाईल असे आश्वासन संस्थेचे अध्यक्ष श्री अनुराग चंद्रवंशी यांनी दिले.

या कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलन व राष्ट्रगीताने झाली. राष्ट्रीय अध्यक्ष अनुराग सर यांचे स्वागत महाराष्ट्र राज्यप्रमुख श्री. लाड यांनी केले व इतर पाहुण्यांचे स्वागत आरती कांबळे, जयश्री शिंदे व सौ. तन्वी चाळके यांनी केले. तसेच सभेची प्रस्तावना व सुत्रसंचालन गजानन फडकले यांनी केले. यावेळी मुंबई २६/११ च्या अतिरेकी हल्लात विशेष कामगिरी केल्याबद्दल पोलीस अधिकारी चाळके यांचा राष्ट्रीय अध्यक्ष यांनी शाळ श्रीफळ व हार देऊन सत्कार केला.

याप्रसंगी गजानन लाड महाराष्ट्र राज्यप्रमुख प्रशासकीय समिती म्हणाले, आपले काम पोलीस प्रशासन व कोर्ट प्रशासन यांचा कामकाज समकक्ष आहे. तेव्हा प्रत्येकाला आपला कायदा व राज्यघटना यांचा अभ्यास असायलाच हवा. यासाठी आम्ही वेळोवेळी कार्यशाळा घेतो, त्यामध्ये सर्वांनी सहभागी व्हायला हवे. ह्युमन राईटस डिफेंडर म्हणुन काम करताना यांचा नक्कीच उपयोग होतो. याप्रसंगी त्यांनी पुढील नोव्हेंबर महिन्यात बिलासपुर छत्तीसगढ होणाऱ्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनची माहिती दिली. यासाठी सर्वांनी तेथे उपस्थित रहावे असे आवाहन देखील केले.

या कार्यक्रमाचा वेळी कोकण विभागातील सहा जिल्हे व पश्चिम महाराष्ट्रातील चार जिल्ह्यातील असे एकुण दहा जिल्ह्यातील कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने शुभम कदम, श्री. चौधरी, महिला वर्ग सौ. गोडांबे, सौ. इंगळे, सौ. रोकडे व डॉ. वाणी, अशोक फडकले या पदाधिकारीनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष मेहनत घेतली. याबद्दल त्यांचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अनुराग सर यांनी विशेष कौतुक केले व आभार मानले.